

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. १८.११.२०२६ | अंक नं. १९२ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020



थंडीचे कपडे...
जन्मलेल्या बाळापासून
मोठ्या महिला व पुरुषांसाठी,
मुला-मुलींसाठी...

स्वेटर्स,जॅकेट, जर्कीन,
टोपी, उलन स्टोल,मफलर,
सॉक्स,सग व
अजून बरेच काही
आणि तेही रास्त दरात

अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८



₹11 लाखांची
1111 बक्षिसे
जिंकण्याची संधी...

विश्वसनीय कापडांची अखंड परंपरा
राजपाल

संगमनेर 02425-222226 | अ.नगर 0241-2999299 | नारायणगाव 02132-242132 | श्रीरामपूर 02422-220090 | नाशिक 9920552780



पोखरणा ज्वेलर्स
नोकरीची सुवर्णसंधी!

पोखरणा ज्वेलर्स येथे खालील पदांसाठी अनुभवी व इच्छुक उमेदवारांची तातडीने भरती सुरू आहे.

सेल्समन - १० जागा
सेल्सगर्ल - १० जागा
अकाउंटंट - २ जागा
हेल्पर - ५ जागा

इच्छुक व मेहनती उमेदवारांनी खालील पत्त्यावर अर्जासह प्रत्यक्ष संपर्क साधावा.
२० ते ३० हजार पर्यंत आकर्षक पगार
अनुभवींना प्राधान्य.
A.H. पोखरणा ज्वेलर्स
शाखा १ : सर्जेपुरा, अहिल्यानगर 83 530 50 505

नगरमध्ये कारमधून गोमांसाची वाहतूक; तिघांना पकडून जमावाने केली मारहाण

नगर – जामखेड रोडवर टाकळी काझी (ता.नगर) येथे गोवंशीय जनावरांची कत्तल करून त्याचे मांस गोण्यांमध्ये भरून मारुती कंपनीच्या स्विफ्ट कारमधून अवैध वाहतूक केली जात असल्याचा प्रकार १७ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ च्या सुमारास उघडकीस आला आहे. काही गोरक्षकांनी ही कार पकडून कार सह आरोपींना पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात प्राणि संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी २ लाख २२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत पो. हे. कॉ. नितीन शिवजी शिंदे (वय ४० वर्षे, नेमणूक नगर तालुका पोलीस स्टेशन) यांनी या फिर्याद दिली आहे. १७ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ च्या सुमारास आरोपींनी त्यांच्या ताब्यातील मारुती सुझुकी कंपनीच्या सिल्वर रंगाच्या स्विफ्ट कारमधून (क्र. एमएच-१२, ईएक्स-७३६८) गोवंशीय जनावरांची कत्तल करून त्याचे सुमारे १५० किलो वजनाचे गोमांस गोण्यांमध्ये भरून बेकायदेशीरपणे वाहतूक करत होते. ही बाब काही गोरक्षकांच्या निदर्शनास येताच त्यांनी टाकळी काझी गावाजवळ सदर कार अडविली. त्यानंतर डायल ११२ वर फोन करून पोलिसांना माहिती दिली. ही माहिती मिळताच नगर तालुका पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांनी या कारवाईमध्ये २ लाख २२ हजार ५०० रुपये किमतीचे १५० किलो गोवंशाचे मांस आणि वाहतुकीसाठी वापरलेली स्विफ्ट कार असा एकूण मोठा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी रेहान गयास कुरेशी, आशिया शब्बीर शेख (दोघे रा. नालबंद खुट, अहिल्यानगर) आणि मुजाहीद मुस्ताक शेख (रा.बाबा बंगाली, कलेक्टर ऑफिस शेजारी, अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात प्राणि संरक्षण अधिनियम १९९५ चे कलम ५(क), ९(अ) आणि मोटर वाहन कायदा कलम ६६(१)/१९२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास नगर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार किशोर लाड करत आहेत.

आरोपींना जमावाकडून बेदम मारहाण, कारची तोडफोड

दरम्यान गोरक्षकांनी सदर कार अडविल्यानंतर त्यामध्ये गोमांस आढळून आले. ही माहिती समजताच त्या ठिकाणी मोठा जमाव जमा झाला होता. या जमावाने तिन्ही आरोपींना बेदम मारहाण केली. तसेच कारचीही मोठ्या प्रमाणावर तोडफोड केली. पोलीस घटनास्थळी गेले तेव्हा त्यांना तिन्ही आरोपी जखमी अवस्थेत आढळून आले होते. त्यामुळे पोलिसांनी त्यांना तातडीने उपचारासाठी नगरमधील रुग्णालयात दाखल केले आहे. अद्याप जखमींनी जबाब दिलेला नसून त्यांना कोणी मारहाण केली याबाबत जखमींनी जबाब दिल्यानंतर मारहाण करणाऱ्या आणि कारची तोडफोड करणाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

यंदाची सुवर्णखरेदी, भरघोस फायद्याची..

दिवाळी धमाका ऑफर

₹999/- प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची) + ₹111/- चांदी चक्क फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)



11 सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी* (प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)

ऑफर कालावधी – 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध

चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु

Conditions Apply*

डीटीपी ऑपरेटर पाहिजे
कोरल ड्रॉ, पेजमेकर, फोटोशॉप, इनडिझाईनच्या कामाचा अनुभव असलेले कॉम्प्युटरसाठी डिटीपी ऑपरेटर पाहिजे.
दैनिक नवा मराठा कार्यालय
कै. आचार्य गुंदेचा चौक, गंज बाजार, अ.नगर

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

अर्बन बँक रोडवरील नामांकित
श्रेणिक कॉर्नर
चालविण्यास देणे आहे.
9422711469

Career Ki Shuruat
DiSHA ke saath
Get Any Course Just in
2700/-
MS-OFFICE, ADV. EXCEL, Tally Prime, Advance Tally, TAXATION, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING C++, CANVA, HTML.
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
दिल्ली गेट शाखा
आनंद केशव हाइट्स, सुपेकर बेकिंगच्या वरती, पहिला मजला, दिल्ली गेट, अ.नगर.
9371051769
जुने बस स्टँड शाखा
अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टँड शेजारी. अ.नगर.
9371151769
पाईपलाईन शाखा
रुचा गार्डन बिल्डिंग, सिव्हिल चौक, पाईपलाईन रोड अहमदनगर
7447761769

आनंद तीर्थ
समर्पण चातुर्मास
समर्पण-सर्व कल्याण

कॅन्सर जनजागृतीपर व्याख्यान





कॅन्सरविषयी जाणून घ्या,
वेळीच निदान करा,योग्य उपचार घ्या!



प्रमुख वक्ते -
पुण्यातील प्रसिद्ध ऑंकोलॉजिस्ट
डॉ. भूषण संजय भळगट
एम.बी.बी.एस , एम.एस, एम.सी.एच. (कॅन्सर सर्जन)

- व्याख्यानाचा विषय -
कॅन्सर निदान व उपचार पद्धती

शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६
वेळ : सकाळी ९:३० वाजता

स्थळ : आनंद तीर्थ समवशरण, अहिल्यानगर

समर्पण चातुर्मास समिति, अहिल्यानगर
चातुर्मास प्रमुख लाभार्थी - श्री. सौरभ प्रमिलाताई हेमराजजी बोरा



कर्तृत्वाचा आणि समाजाप्रती असलेल्या
समर्पणाचा हा यथोचित गौरव





समाजासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची आणि नि:स्वार्थ योगदानाची दखल घेत आमचे कंवरसाहब व तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त, समर्पण चातुर्मासाचे मुख्यलाभार्थी
श्री. सौरभजी हेमराजजी बोरा
यांना 'समाजरत्न'
तसेच समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष
श्री. अशोकजी (बाबुशेठ) बोरा यांना
'समाजगौरव'
या पुरस्काराने सन्मानित होणे ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे...
हार्दिक अभिनंदन !

सुधीर चोपडा * निलेश चोपडा
एवम् चोपडा परिवार
saideep
साईदीप ग्रुप
अहिल्यानगर - पुणे

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक के. आचार्य गुरुजी
नवा मराठा
फोन - २४१४१४१, २४१९९९९, मो. ९२०९६६६६६६
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

शहरामधील १० टक्के पाणी कपातीचा निर्णय अहिल्यानगर महापालिकेने केला स्थगित

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांचे एक महिन्याचे मानधन दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठ्याच्या उपाययोजनांसाठी देणार



पाणीप्रश्नावर महापौर ज्योती गाडे यांनी नगरसेवकांची बैठक आयोजित केली होती. (छायाचित्र : लहू दळवी)

नगर - दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने लागू केलेल्या १० टक्के पाणी कपातीच्या निर्णयाला अहिल्यानगर महापालिकेने स्थगिती दिली आहे. शहरातील पाणीप्रश्नावर महापौर ज्योती गाडे यांनी नगरसेवकांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीत शहराच्या हक्काचे पाणी नागरिकांना मिळावे, अनधिकृत नळ कनेक्शन शोधून अधिकृत करावेत, पाणी वितरणातील असमतोल दूर करावा, गळती रोखावी तसेच पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करावे, अशा विविध मागण्या नगरसेवकांनी केल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांचे एक महिन्याचे मानधन दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठ्याच्या उपाययोजनांसाठी देण्यात येणार असल्याची घोषणा नगरसेवक संपत बारस्कर यांनी केली. तर पुढील ३० वर्षांचा विचार करून महापालिकेच्या पाणीपुरवठा योजनेचा ५०० कोटी रुपयांचा डीपीआर शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी गणेश गाडळकर यांनी दिली.

महापौर ज्योती गाडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीस आयुक्त यशवंत डांगे, सभापती दीपलीताई बारस्कर, जलसंपदा विभागाचे अभियंता पारखे यांच्यासह नगरसेवक उपस्थित होते. पाणीप्रश्नावर बैठक आयोजित केल्याबद्दल नगरसेवकांनी महापौरांचे कौतुक केले. तसेच यापुढे महापालिकेच्या सर्व विभागांच्या बैठका आयोजित करून विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

कनेक्शन अधिकृत न केल्यास कारवाई करा

नगरसेवक निखिल वारे यांनी शहराच्या हक्काच्या पाण्याचा मुद्दा उपस्थित करत ग्रामपंचायती आणि इतर शासकीय कार्यालयांना महापालिकेच्या पाइपलाइनमधून देण्यात आलेल्या पाण्याबाबत निर्णय घेण्याची मागणी केली. शहरात सुमारे दीड लाख मालमत्ता असून नळ कनेक्शनची संख्या सुमारे ७० हजार असल्याची माहिती देत या तफावतीकडे लक्ष वेधले. शहरातील अनधिकृत नळ कनेक्शन शोधून काढावेत. एकविरा चौकातील एका अपार्टमेंटमध्ये २० फ्लॅट असून तेथे पाणी कुठून येते, याची चौकशी करावी. अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करून घेण्यासाठी नागरिकांना संधी द्यावी; मात्र त्यानंतरही कनेक्शन अधिकृत न केल्यास संबंधितांवर दंडात्मक व फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

पाणी वितरणातील असमतोल दूर करा

नगरसेवक अविनाश घुले यांनी शहरातील पाणी वितरणातील असमतोल दूर करण्याची मागणी केली. काही भागात दररोज पाणीपुरवठा होतो, तर काही भागात दोन ते तीन दिवसांनी आणि काही ठिकाणी आठ दिवसांनी पाणी मिळते. हा असमतोल दूर करून पाणीपुरवठ्याचे निश्चित वेळापत्रक तयार करावे आणि नागरिकांना पूर्ण दाबाने पाणी उपलब्ध करून द्यावे, असे त्यांनी सांगितले.

पाइपलाइन गळतीची तक्रारीची दखल घ्यावी

पाणी बचत आणि गळती रोखण्यासाठी नळांना तोट्या बसवाव्यात. दुष्काळाच्या परिस्थितीकडे संकट म्हणून न पाहता संधी मानून शासनाकडून पाणीपुरवठा योजनेसाठी विशेष निधी मिळविण्याचा प्रयत्न करावा. पाणीटंचाईसंदर्भातील प्रस्ताव तयार करावेत, नागरिकांमध्ये पाणी बचतीबाबत जनजागृती करावी. आगामी काही महिन्यांत पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व वाढणार असून नागरिक किंवा नगरसेवकांनी पाइपलाइन गळतीची तक्रार केल्यानंतर तातडीने दुरुस्तीचे काम हाती घ्यावे. शहरातील पाण्याचे नियोजन करण्यासाठी दुष्काळी आराखडा तयार करावा, असे अविनाश घुले यांनी सांगितले.

मनोज कोतकर यांची कपातीची मागणी

नगरसेवक मनोज कोतकर यांनी सांगितले की दहा टक्के पाणी कपात होणे गरजेचे आहे जेणेकरून हे पाणी पुढील पाण्याच्या संकट काळामध्ये वापरता येईल जून जुलैमध्ये जर वेळेवर पाऊस आला नाही तर पाणी प्रश्न गंभीर होणार असून आत्ता दहा टक्के कपात केलेले पाणी आपल्याला वापरता येईल अन्यथा आपल्या सर्वांना मोठ्या पाणी संकटाला सामोरे जावे लागेल. मार्च-एप्रिलमध्ये पाणीप्रश्न गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली. त्यासाठी प्रशासनाने आतापासूनच नियोजन करावे. अनधिकृत नळ कनेक्शन देणाऱ्यांवरही कारवाई करावी आणि पाणीप्रश्नासाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, असे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री विखे पाटील आणि जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठक

महापौर ज्योती गाडे यांनी सर्व नगरसेवकांचे म्हणणे ऐकून घेतले असून महापालिकेच्या माध्यमातून पाणीप्रश्नावर योग्य नियोजन करण्यात येईल, असे सांगितले. पाणी गळती रोखण्यासाठी उपाययोजना केल्या जातील, नळांना तोट्या बसविण्यात येतील आणि अनधिकृत नळ कनेक्शनवर कारवाई करण्यात येईल. शहरातील पाणी नियोजनाचा आराखडा तयार करून त्यानुसार पाणीपुरवठा करण्यात येईल. वॉशिंग सेंटर आणि स्विमिंग टँक यांच्याबाबत पुढील महिन्यात निर्णय घेतला जाईल. शहरातील पाणीप्रश्नावर पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठक आयोजित करण्यात येईल, असे महापौरांनी सांगितले.

नगरसेवकांनी मांडलेल्या सूचनांचे तातडीने निराकरण

पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी गणेश गाडळकर यांनी नगरसेवकांनी मांडलेल्या सूचनांचे तातडीने निराकरण करण्यात येईल, असे सांगितले. पुढील ३० वर्षांचा विचार करून महापालिकेच्या पाणीपुरवठा योजनेचा सुमारे ५०० कोटी रुपयांचा डीपीआर शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. या योजनेमध्ये मुळा धरणातून नवीन पाइपलाइन टाकणे, शहरातील अंतर्गत पाणी वितरण व्यवस्था सुधारणे आणि नवीन दहा पाण्याच्या टाक्या उभारणे प्रस्तावित आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

अनधिकृत नळ कनेक्शनवर कारवाई होणार

आयुक्त यशवंत डांगे यांनी अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करून घेण्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून अभय योजना राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली. या योजनेद्वारे नागरिकांना अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करून घेण्याची संधी दिली जाईल. शहरातील पाणीपुरवठ्याचे नियोजन, गळती नियंत्रण, पाणी बचत, अनधिकृत कनेक्शनवर कारवाई आणि भविष्यातील पाणीटंचाई लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाकडून उपाययोजना करण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

अहिल्यानगर-पाथर्डी रोडवरील भुईकोट किल्ल्यासमोर अपघात

मोटरसायकलच्या धडकेत एकाचा मृत्यू, तर दोन जण जखमी

नगर - शहरातील नगर-पाथर्डी रोडवरील भुईकोट किल्ल्यासमोरील बुऱ्हाणनगर फाट्यावर भरधाव मोटरसायकलने धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या अपघातात इतर दोन जण जखमी झाले असून, याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या अपघातात प्रकाश दिलीप कुंवर (वय ३० वर्षे, रा. बामखेडा, ता. शाहदा, जि. नंदुरबार) हे सागर भाऊसाहेब पगारे (रा. सैनिकनगर, भिंगार) व सुरेश अनिल शिंदे (रा. यशवंत नगर, भिंगार) हे दोघेजण कमी-अधिक प्रमाणात जखमी झाले. याबाबत राहुल चुनीलाल कोळी (वय ३२ वर्षे, रा. संकल्प कॉलनी, बुऱ्हाणनगर, ता.नगर) यांनी १७ नोव्हेंबर रोजी फिर्याद दिली आहे. ५ नोव्हेंबर रोजी रात्री ८:३० वाजण्याच्या सुमारास नगर-पाथर्डी रोडवरील भुईकोट किल्ल्यासमोरील बुऱ्हाणनगर फाट्यावर हा अपघात घडला. मयत प्रकाश दिलीप कुंवर हे त्यांच्या हिरो कंपनीची एचएफ डीलक्स मोटरसायकल (क्र. एमएच १६ बीआर ४०१०) घेऊन नगर शहरात चालले होते. त्यावेळी आरोपी सुमित सुनील मकासरे (रा. यशवंतनगर, भिंगार) याने त्याच्या ताब्यातील होंडा कंपनीची मोटरसायकल (क्र. एमएच १६ डीएफ ७१५५) ही रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष भरधाव वेगात चालवली. आरोपीने मयत प्रकाश कुंवर यांच्या मोटरसायकलला समोरून जोराची धडक दिली, ज्यामुळे दोन्ही मोटरसायकलचे नुकसान झाले आणि या अपघातात प्रकाश कुंवर यांचा मृत्यू झाला. तसेच या अपघातात मयतासोबत असलेले सागर भाऊसाहेब पगारे व सुरेश अनिल शिंदे हे दोघेजण जखमी झाले.

अपघात घडल्यानंतर आरोपी सुमित मकासरे याने जखमींना कोणतीही मदत न करता व अपघाताची पोलिसांना खबर न देता घटनास्थळावरून निघून गेला. या प्रकरणी राहुल कोळी यांच्या फिर्यादीवरून आरोपी सुमित सुनील मकासरे याच्या विरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात बीएनएस कलम १०६(१), २८१, १२५(अ)(ब), ३२४(४) सह मोटर वाहन कायदा कलम १३४(३७)(७), १८४/१७७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास कॅम्प पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार बारगजे करत आहेत.

नर्मदाबाई बारस्कर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सावेडी येथील रहिवासी श्रीमती नर्मदाबाई भिमराज बारस्कर (वय ७५) यांचे १६ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ भाऊ, सुना, नातवंडे, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे. शंकर, दत्तात्रय बारस्कर, मंदा जाधव यांच्या त्या मातोश्री होत.

रामदास ठुबे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - शिलाविहार सावेडी येथील रहिवासी रामदास नारायण ठुबे (वय ७५) यांचे १६ नोव्हेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, ५ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. संदीप काळे यांचे ते सासरे होत.

रमणीकभाई छेडा यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सावेडी येथील नोबेल हॉस्पिटल मागील धनाजीनगर येथील रहिवासी रमणीकभाई रामजी छेडा (वय ६८) यांचे १८ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ भाऊ, भावजय, २ मुली, पुतण्या, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

लक्ष्मीबाई कोडम यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सावेडी येथील नित्यसेवा सोसायटीतील रहिवासी लक्ष्मीबाई नागेश कोडम (वय ७०) यांचे १७ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दत्तात्रय, श्रीनिवास व अंबादास यांच्या त्या मातोश्री होत.

अनिल मुंदडा यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील अनिल बद्रीनारायण मुंदडा (वय ५५) यांचे अल्प आजाराने दुःखद निधन झाले. जुगलकिशोर, कमलकिशोर (के.बी.मुंदडा) व ॲड.सुनील मुंदडा यांचे धाकटे बंधू, हेमंत, कुंदन, नंदन व गोविंद मुंदडा यांचे चुलते, अर्णव व आर्यन मुंदडा यांचे वडील होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुनाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

स्वस्तिक चौकातील चहाच्या दुकानात ५ जणांनी घातला राडा; गुन्हा दाखल

१५०० रुपयांची रोकड लुटून पेटीएम बॉक्स फोडला, दुकान फोडण्याचीही दिली धमकी

नगर - चहाच्या किमतीवरून झालेल्या वादातून ५ जणांच्या टोळक्याने चहाच्या टपरीवर येऊन आरडाओरडा करत १५०० रुपयांची रोकड लांबवली आणि पेटीएम बॉक्स फोडून टाकत तेथील कामगाराला शिवीगाळ करत जीवे मारण्याची तसेच टपरी फोडून टाकण्याची धमकी दिल्याची घटना १७ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ च्या सुमारास स्वस्तिक चौकातील अरुणोदय टी कॉर्नर येथे घडली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सोनू नवनाथ पोते (वय २२ वर्षे, रा. चिपाडे मळा, सारसनगर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. स्वस्तिक चौकात आनंद बडे यांच्या मालकीचे अरुणोदय टी कॉर्नर हे चहाचे दुकान आहे. तेथे फिर्यादी सोनू पोते हा कामाला आहे. १७ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास या चहाच्या टपरीवर आरोपी विजय फुलसौंदर, हर्षवर्धन भोसले, आप्पा भोसले, सुरज भोसले आणि शौर्य मदने (सर्व रा. आखाडा, अहिल्यानगर) हे आले. आरोपींनी टपरीवर येऊन तू एवढा महाग चहा का विकतोस? अशी विचारणा केली. त्यावर फिर्यादीने आमच्याकडे १५ रुपयालाच चहा असल्याचे सांगितले. या गोष्टीचा राग मनात धरून आरोपींनी वाद घातला आणि फिर्यादीच्या टपरीच्या गल्यातील १५०० रुपये रोख रक्कम काढून घेतली. तसेच पेटीएम बॉक्स फोडून टाकला व फिर्यादीला शिवीगाळ करून जीवे मारण्याची तसेच टपरी फोडून टाकण्याची धमकी देऊन आरोपी तिथून निघून गेले.

या प्रकरणी सोनू पोते यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात सदरील ५ आरोपींच्या विरुद्ध बीएनएस कलम ३२४(४), ११९(१), ३५१(२), १८९(२), १९१(२), १९० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक मेढे करत आहेत.

वाळू तस्करी रोखण्यासाठी गेलेल्या शासकीय पथकावर हल्ल्याचा प्रयत्न

प्रवरा नदी पात्रात दोन ठिकाणी घडल्या घटना, वाळूतस्करांवर २ स्वतंत्र गुन्हे दाखल

नगर - संगमनेर तालुक्यातील रहिमपूर व मनोली परिसरातील प्रवरा नदीपात्रात विनापरवाना अवैध वाळू उपसा करून शासनाच्या कामात अडथळा आणल्याप्रकरणी आणि शासकीय पथकावर दबाव टाकत त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करून पळून गेल्याप्रकरणी आश्वी पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणी महसूल अधिकाऱ्यांच्या फिर्यादीवरून वाळू तस्करांवर कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पहिली घटना मनोली ते रहिमपूर जाणाऱ्या रस्त्यावरील मनोली हद्दीत घडली. ग्राम महसूल अधिकारी बाळकृष्ण विक्रम सावळे (रा. घुलेवाडी, ता. संगमनेर) हे शासकीय कर्तव्य बजावत असताना आरोपी सौरभ बन्सी गुळवे, विशाल नानासाहेब गुळवे आणि युवराज दिलीप वाकुंज (सर्व रा. रहिमपूर, ता. संगमनेर) यांनी त्यांच्या ताब्यातील विनाक्रमांकाच्या पांढऱ्या रंगाच्या झेनॉन गाड्यांच्या सहाय्याने प्रवरा नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळूचे उत्खनन केल्याचे निदर्शनास आले. तसेच शासकीय पथकाची गाडी अडवून त्यांना हुलकावणी देत पळून जात शासनाच्या कामकाजात अडथळा आणल्याप्रकरणी आश्वी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसरी घटना रहिमपूर बंधारा नदीपात्रात घडली असून, ग्राम महसूल अधिकारी प्रवीण गजानन ढोले (रा. गुंजाळवाडी, ता. संगमनेर) हे कारवाई करत असताना आरोपी सौरभ बन्सी गुळवे, विशाल नानासाहेब गुळवे, दत्तात्रय सुखदेव शिंदे, अक्षय भाऊसाहेब गुळवे, अमोल बाळासाहेब भोरे, सुनील लक्ष्मण पाटोळे आणि युवराज दिलीप वाकुंज (सर्व रा. रहिमपूर, ता. संगमनेर) यांनी विनानोंदणीच्या ३ ते ४ झेनॉन पिकअप गाड्या व एक केसरी रंगाचा विनानोंदणीचा ट्रॅक्टर नदीपात्रात नेऊन मोठ्या प्रमाणावर वाळूचे उत्खनन केल्याचे निष्पन्न झाले.

शासकीय पथकाला अडथळा निर्माण करून महसूल बुडवून स्वतःच्या फायद्यासाठी वाळूची चोरी करून पळून गेल्याप्रकरणी या सर्व आरोपींवर आश्वी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदर दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास आश्वी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार लहामगे करत आहेत.

रात्रीच्या वेळी घरात घुसून दागिन्यांची चोरी, तीन अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - रात्रीच्या वेळी घराच्या दरवाजाचा कडी-कोयंडा तोडून आत घुसलेल्या तीन अज्ञात चोरट्यांनी घरातील आजीच्या अंगावरील सोन्याचे दागिने जबरदस्तीने काढून घेत आणि कपाटाची उचकापाच करून एकूण ५५ हजार रुपये किमतीचा ऐवज लांबवल्याची घटना संगमनेर तालुक्यातील अंभोरे येथे घडली आहे. या प्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रणय रंगनाथ सोन्नर (वय २२ वर्षे, रा. अंभोरे, ता. संगमनेर) यांनी फिर्याद दिली आहे. १६ नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजेपासून ते १७ नोव्हेंबर रोजी पहाटे १:१५ वाजेच्या दरम्यान ही चोरी झाली. ३ चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश करून घरातील आजीच्या गळ्यातील व कानातील सोन्याचे दागिने काढून घेत तुला मारून टाकीन असा दम दिला व कपाटातील रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकूण ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. त्यानंतर घरातील पेटी व सुटकेस घरापासून काही अंतरावर फेकून देऊन चोरटे पसार झाले. या प्रकरणी ३ अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३३१(५), ३०५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पारनेर तालुक्यामध्ये तरुणाची तर लोणीत महिलेची गळफास घेत आत्महत्या

नगर - अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर व लोणी परिसरामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या दोन वेगवेगळ्या दुर्दैवी घटना समोर आल्या आहेत. या दोन्ही प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये आकस्मात मृत्यूच्या नोंदी करण्यात आल्या आहेत.

पहिल्या घटनेत, पारनेर तालुक्यातील वनकुटे येथील गणेश भिवा केसकर (वय २७ वर्षे) यांनी राहत्या घरीकोणत्याही कारणावरून गळफास घेतला. ही बाब निदर्शनास येताच त्यांना उपचारासाठी तातडीने टाकळी ढोकेश्वर ग्रामीण रुग्णालय येथे दाखल करण्यात आले होते. परंतु, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच उपचारापूर्वी ते मयत झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घोषित केले. या घटनेबाबत ग्रामीण रुग्णालय टाकळी ढोकेश्वरकडून मिळालेल्याअहवालावरून पारनेर पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस अंमलदार गायकवाड करत आहेत.

दुसऱ्या घटनेत, लोणी खुर्द येथील धनगर लवान रोड परिसरात राहणारी विवाहित २१ वर्षीय महिला साक्षी रोहित कुऱ्हे हिने राहत्या घरी छताच्या एंगलला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. याबाबत तिचे सासरे शरद दत्तात्रय कुऱ्हे यांनी लोणी पोलीस ठाण्यात खबर दिली. लोणी पोलिसांनी या प्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून, प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल डमाळे करत आहेत.

लष्कराच्या सीक्युएव्ही परिसरातच बिबट्याचे वास्तव्य

वनविभागाची ड्रोनच्या सहाय्याने रात्रंदिवस शोध मोहीम सुरूच

नगर - शहरातील दाट लोकवस्ती असलेल्या तारकपूर परिसरात दोन दिवसांपूर्वी दिसून आलेल्या बिबट्याचे वास्तव्य छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील महापालिका कार्यालयाशेजारील लष्कराच्या सीक्युएव्ही परिसरातच असून तो शहरात मानवी वस्तीत येवू नये यासाठी वनविभागाकडून प्रयत्न केले जात आहेत. वनविभागाचे पथक या परिसरात रात्रंदिवस गस्त घालत तसेच ड्रोनच्या सहाय्याने बिबट्याचा शोध घेत आहे. सीक्युएव्ही परिसरात वन विभागाने पिंजराही लावला असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे यांनी दिली.

शहराच्या मध्यवर्ती भागात तारकपूर परिसरात बिबट्याचा वावर आढळून आला होता. ड्रोन कॅमेऱ्यात ही हालचाल दिसून आल्यानंतर, १५ नोव्हेंबर रोजी हा व्हिडिओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला. त्यामुळे परिसरात दहशत पसरली आहे. विशेषतः सीक्युएव्ही परिसरात बिबट्याची हालचाल ड्रोन कॅमेऱ्यात हालचाल दिसून आल्यानंतर,वनविभागाने सीक्युएव्ही परिसरात पिंजरे लावल्याची माहिती दिली.

वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे यांनी सीक्युएव्ही परिसरात सुमारे २० ते २५ एकर क्षेत्र आहे, तेथे जंगलाप्रमाणे झाडे झुडपे आहेत. त्यामुळे तेथेच बिबट्याचा वावर असल्याचे सांगत तो शहरात लोकवस्तीत येवू नये यासाठी वन विभागाचे पथक खबरदारी घेत असून रात्रंदिवस या परिसरात अत्याधुनिक ड्रोन कॅमेऱ्याद्वारे शोध मोहीम सुरु आहे. बिबट्या दिसल्यास त्यास तात्काळ जेरबंद करण्यासाठी रेस्क्यू टीमही तैनात करण्यात आलेली आहे.

बिबट्या आपल्या भागात आहे, असे निदर्शनास आल्यास नागरिकांनी घाबरून न जाता खबरदारी घेणे आवश्यक आहे. रात्री अंधारात एकटे बाहेर पडू नये तसेच लहान मुलांना बाहेर एकटे खेळू देऊ नये. बिबट्या जवळपास आढळून आल्यास फटाके वाजवल्यास तो दूर पळून जातो. घराच्या बाहेर अंधार नसावा. बाहेरील लाईट चालू ठेवाव्यात. बिबट्या दिसल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा, नागरिकांनी सोशल मिडीयावर अफवा पसरवू नयेत तसेच घाबरून जाऊ नये, मात्र खबरदारी जरूर घ्यावी असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे यांनी केले आहे.

गृहिणी

आरोग्य

एचबी वाढविण्यासाठी...

रक्तातील हिमोग्लोबीन कमी होणे ही आजकाल सर्वांमध्ये दिसणारी सामान्य समस्या झाली आहे. यामुळे सतत थकवा येणे, थोडीशी मेहनत केली तरी धाप लागणे, चक्कर येणे, डोके दुखणे, चेहरा आणि डोळे फिकट दिसणे, हातापायांना मुंग्या येणे, केस गळणे आणि कोणत्याही कामात उत्साह न वाटणे असे त्रास सुरू होतात. अशा वेळी केवळ औषधांवर अवलंबून न राहता आपल्या स्वयंपाकघरातील काही साध्या उपायांनी आणि आहारातील बदलांनी रक्त नैसर्गिकरित्या वाढवता येते. रोजच्या आहारात लोह असलेले पदार्थ वाढवणे हे सर्वात महत्त्वाचे आहे. बीट हे रक्त वाढवण्यासाठी अत्यंत गुणकारी मानले जाते. बीटामध्ये लोहाबरोबरच शरीराला लागणारी अनेक जीवनसत्वे असतात. रोज सकाळी एक बीट खाणे किंवा त्याचा रस करून पिणे अतिशय फायदेशीर ठरते. खजूर, मनुका, अंजीर आणि गूळ यामध्ये नैसर्गिक लोह भरपूर प्रमाणात असते. रात्री पाण्यात भिजवलेले चार-पाच मनुके आणि दोन खजूर सकाळी रिकाम्या पोटी खाल्ल्याने शरीरात नवे रक्त तयार होण्यास मोठी मदत होते. आपली जुनी पद्धत असलेला जेवणानंतर गुळाचा छोटा खडा आणि भाजलेले शेंगदाणे खाण्याचा उपाय आजही तितकाच प्रभावी आहे.हिरव्या पालेभाज्यांचा रोजच्या जेवणात आवर्जून समावेश करावा. पालक, मेथी, चुका, लाल माठ आणि शेवग्याच्या पानांच्या भाजीमध्ये लोहाचे प्रमाण खूप जास्त असते. सफरचंद आणि पपई यांसारखी फळेही रक्त शुद्ध करण्यासाठी उपयुक्त आहेत.केवळ लोह खाऊन उपयोग होत नाही, तर ते शरीरात शोषले जाणेही गरजेचे आहे. लोहाचे शोषण होण्यासाठी शरीराला आंबट पदार्थांची गरज असते. म्हणून लोहयुक्त पदार्थ खाताना त्यावर लिंबू पिळावे. आवळा हा तर लोह शोषणाचा राजा आहे. रोज सकाळी एक आवळा किंवा आवळ्याचा रस घेतल्याने लोह लवकर रक्तात मिसळते. संत्री, मोसंबी यासारखी आंबट फळेही यासाठी चांगली आहेत.यासोबतच काही पथ्ये पाळणे अत्यंत गरजेचे आहे. चहा आणि कॉफी जेवणाच्या लगेच आधी किंवा नंतर अजिबात घेऊ नये. त्यात असलेल्या घटकांमुळे लोहाचे शोषण थांबते. जेवण नेहमी लोखंडाच्या कढईत बनवावे, त्यामुळेही अन्नात लोह उतरते. रोज सकाळी कोवळ्या उन्हात पंधरा-वीस मिनिटे बसणे आणि नियमित अर्धा तास चालणे, प्राणायाम करणे यामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि हिमोग्लोबीन नैसर्गिकरित्या वाढते.

पाककला

मटका रबडी बर्फी

साहित्य : फुल फॅट दूध १ लिटर, मिल्क पावडर १ वाटी, साखर १/२ वाटी, तूप २ चमचे, वेलची पावडर १/४ चमचा, बदाम काप १ चमचा, पिस्ता काप १ चमचा, केशर काड्या ८-१०, सजावटीसाठी छोटे मटके ४-५

कृती : जाड बुडाच्या कढईत दूध घेऊन मध्यम आचेवर आटवायला ठेवा. दूध आटत आले की त्यात मिल्क पावडर आणि तूप घालून सतत ढवळत रहा. मिश्रण घट्ट होऊन कढई सोडू लागले की त्यात साखर, केशर आणि वेलची पावडर घाला. साखर विरघळून मिश्रण पुन्हा घट्ट होईपर्यंत परतून घ्या. शेवटी बदाम आणि पिस्त्याचे काप घालून मिश्रण एकजीव करा. गॅस बंद करून मिश्रण थोडे कोमट होऊ द्या. तयार मिश्रण छोट्या मटक्यांमध्ये दाबून भरा. वरून बदाम, पिस्ता आणि केशरने सजवा. फ्रिजमध्ये २ तास सेट होण्यासाठी ठेवा. तयार मटका रबडी बर्फी थंड सर्व्ह करा.

वास्तू

गॅस व शेगडी

* अग्नीची दिशा आग्नेय आहे. त्यामुळे गॅस शेगडी नेहमी स्वयंपाकघराच्या आग्नेय कोपऱ्यात आणि स्वयंपाक करणाऱ्याचे तोंड पूर्वेला होईल अशा पद्धतीने ठेवावी. यामुळे घरातील व्यक्तींचे आरोग्य चांगले राहते आणि घरात भांडणे कमी होतात.

* देवघर हे घरातील सर्वात पवित्र स्थान आहे, त्यामुळे ते नेहमी ईशान्य दिशेलाच असावे.

सौंदर्य

* कोरफड गर रोज चेहऱ्याला लावल्याने मुरूमे कमी होतात.

* मध आणि लिंबू रस एकत्र करून लावल्याने त्वचा उजळते.

सल्ला

* उरलेली चपाती मिक्सरमध्ये बारीक करून कटलेट करा.

* दुध फाटले तर फेकू नका, त्याचे पनीर बनवा.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १९ नोव्हेंबर २०२६

---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, पू.भा. अहोरात्र, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.

राशिभविष्य

मेष : आज अचानक धनलाभ होण्याची शक्यता आहे.

वृषभ : कौटुंबिक वातावरणात आनंदाचे क्षण येतील.

मिथुन : कामाच्या ठिकाणी तुमचे वर्चस्व वाढेल. प्रवासातून लाभ होईल.

कर्क : मनातील इच्छा पूर्ण होण्याचा दिवस आहे.

सिंह : व्यवसायात मोठी प्रगती होईल. समाजात मान-सन्मान वाढेल.

कन्या : आरोग्यामध्ये सुधारणा दिसून येईल. रखडलेले पैसे परत मिळतील.

तूळ : जोडीदारासोबत वेळ चांगला जाईल.

वृश्चिक : नोकरीत बढतीचे योग आहेत. शत्रू पक्ष आज शांत राहील.


धनू : विद्यार्थ्यांसाठी यशाचा दिवस आहे. स्पर्धेत विजय मिळेल.

मकर : घरात शुभ कार्य घडण्याचे संकेत आहेत.

कुंभ : मित्रांच्या भेटीगाठी होतील. अडकलेली कामे मार्गी लागतील.

मीन : आजचा दिवस प्रेम आनंदाने भरलेला असेल. कला क्षेत्रात नाव होईल.

शब्दगंध क्र. ७५५८ सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) भारताचे एक माजी पंतप्रधान ४) लढाऊ जातीचा माणूस ६) म्हैस; शिवाय ७) मोठा हातोडा ८) दिलेला शब्द न पाळणे १२) महादेवाचा पुजारी; एक समाज १४) राजस्थानातील एक पर्वत १६) जडपणा; ओझे; पत; प्रतिष्ठा १८) धर्मार्थ देणे १९) राखून ठेवलेले २०) मुस्लिम पुरुषाचे एक नाव २१) नव्याने; अलीकडे; अलीकडचे

शब्दगंध क्र. ७५५७ चे उत्तर

का	र	खा	ना	■	क	प	डा
नि	वा	र	क	■	ला	रा	■
फ	ळ	■	तो	ह	म	त	■
ना	■	र	डा	र	■	■	घी
थ	क	वा	■	दा	■	खा	■
■	वा	■	मा	स	ले	दा	र
सा	य	क	ल	■	ख	ड	क
ल	त	■	क	मा	न	■	टे

उभे शब्द :- १) देव २) गती; स्पीड ३) सन्मान; आदर ४) अल्प काळ टिकणारे; क्षणांत नष्ट होणारे ५) कुबेराचे सेवक ७) एखाद्या संख्येच्या वर्गाला त्याच संख्येने गुणून येणारी संख्या ९) तळलेला एक खमंग खाद्यपदार्थ १०) फळातील रसाळ भाग; मगज ११) आवश्यकता; नड; जरुरी १३) जड; पत असलेला; प्रतिष्ठित १४) देवादिकांचे अन्य रूपाने पृथ्वीवर येणे १५) जंगलाचा राजा; सिंह; केसरी १७) पवित्र; शुद्ध; शुभ

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

सुविचार : देवाने प्रत्येकाला हिरा बनवून पाठवले आहे, पण चमकायचे कसे हे आपल्यावर अवलंबून आहे.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

नोटा मोजण्याची मशिन घरगुती वापरासाठी मिळते का?

चलनी नोटा मोजण्याचे यंत्र हे घरगुती वापरासाठी आता सहज विकत मिळते आणि त्याचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. पूर्वीच्या काळी अशी यंत्रे केवळ मोठ्या बँका, सरकारी तिजोरी किंवा मोठ्या व्यापारी आस्थापनांमध्येच पाहायला मिळत असत, कारण ती आकाराने मोठी, वजनाने जड आणि किंमतीने खूप महाग असत. सामान्य माणसाला त्याची गरज वाटत नसे आणि ती घेणे परवडतही नसे. परंतु आता काळ बदलला आहे. अनेक कुटुंबांमध्ये बचतीचे पैसे, महिला बचत गटाचे पैसे, भिशीचे पैसे, छोट्या व्यवसायातील रोजची जमा अशा नोटा मोजण्याचे काम घरातच करावे लागते. हाताने नोटा मोजताना वेळ लागतो, चूक होते आणि कंटाळाही येतो. हीच अडचण लक्षात घेऊन आता लहान, सुटसुटीत आणि घरात ठेवता येईल अशी यंत्रे तयार करण्यात आली आहेत.

या घरगुती यंत्रांचे अनेक प्रकार बाजारात उपलब्ध आहेत. काही यंत्रे अगदी हाताच्या पंजाएवढी छोटी असतात. ती वजनाला अगदी हलकी असतात, त्यामुळे एका खोलीतून दुसऱ्या खोलीत किंवा एका गावाहून दुसऱ्या गावी सहज नेता येतात. काही यंत्रे घरातील विजेवर चालतात तर काही विजेरीवर चालतात, त्यामुळे वीज नसली तरी काम थांबत नाही. या यंत्रांची नोटा मोजण्याची गती देखील चांगली असते. एका मिनिटामध्ये पाचशे ते एक हजार नोटा सहज मोजल्या जातात. घरगुती वापरासाठी ही गती पुरेशापेक्षा जास्त आहे.

याशिवाय या यंत्रांमध्ये बनावट नोट ओळखण्याची विशेष सोय दिलेली असते. नोटेतील धागा, शाई आणि कागदाची प्रत तपासून ती खरी आहे की खोटी हे यंत्र लगेच सांगते, त्यामुळे फसवणूक होण्याचा धोका टळतो. काही प्रगत यंत्रांमध्ये वेगवेगळ्या किमतीच्या नोटा वेगळ्या करून एकूण रक्कम किती झाली हे सांगण्याची सुविधाही असते. अशा यंत्रांची किंमत आता सर्वसामान्यांच्या आवाक्यात आली आहे. अगदी छोट्या आणि हाताने वापरता येणाऱ्या यंत्राची किंमत तीन ते चार हजार रुपयांपासून सुरू होते. मध्यम आकाराचे आणि बनावट नोट ओळखण्याची सोय असलेले यंत्र सहा ते आठ हजार रुपयांमध्ये मिळते. तर दुकान किंवा कार्यालयात वापरता येईल असे थोडे मोठे यंत्र दहा ते बारा हजार रुपयांपर्यंत मिळते. ही सर्व यंत्रे आता आंतरजालावरील विक्री केंद्रांवर, मोठ्या बाजारपेठांमधील विद्युत उपकरणांच्या दुकानांमध्ये आणि काही वेळा स्थानिक बाजारातही मिळतात. त्यावर एक वर्षाची हमी देखील मिळते. एकदा हे यंत्र घेतले की वर्षानुवर्षे नोटा मोजण्याची चिंता मिटते, वेळ वाचतो, अचूक हिशेब लागतो.

रागावर नियंत्रण

एका गुरूंच्या आश्रमात दोन शिष्य होते - एक खूप शांत आणि दुसरा खूप रागीट. रागीट शिष्याला प्रत्येक गोष्टीचा राग यायचा. एक दिवस गुरुंनी दोघांनाही एक-एक पिशवी दिली. एका पिशवीत दगड भरले होते आणि दुसऱ्या पिशवीत कापूस भरला होता.

गुरू म्हणाले, रागीट शिष्याने दगडाची पिशवी आणि शांत शिष्याने कापसाची पिशवी एक दिवसभर पाठीवर घेऊन फिरायचे. ज्या-ज्या व्यक्तीचा तुम्हाला राग येईल, त्याचे नाव घेऊन पिशवीतून एक वस्तू काढून फेकायची. संध्याकाळी दोघेही परत आले.

रागीट शिष्याची पिशवी रिकामी झाली होती, कारण त्याने दिवसभरात वाटेत भेटलेल्या प्रत्येकाचा राग केला होता आणि सगळे दगड रागाने फेकून दिले होते. त्याचे हात दुखत होते, मन अशांत होते. शांत शिष्याची पिशवी मात्र जशीच्या तशी भरलेली होती. तो म्हणाला, गुरुदेव, मला कोणाचाच राग आला नाही, त्यामुळे मी एकही कापूस फेकला नाही. तेव्हा गुरू म्हणाले, बघितलंस का फरक? राग म्हणजे पाठीवरच्या दगडासारखा असतो. तू जेवढा जास्त राग करशील, तेवढे दगड तू दुसऱ्यावर फेकतोस असे तुला वाटते, पण खरे तर त्या दगडाचा भार तुझ्याच मनावर राहतो आणि फेकताना तुझ्याच हाताला जखम होते आणि शांतता ही कापसासारखी आहे, ती कितीही वेळ पाठीवर राहिली तरी तिचा भार जाणवत नाही. रागीट शिष्याला त्या दिवशी खरे ज्ञान मिळाले. दुसऱ्यावर राग काढल्याने दुसऱ्याचे काहीही नुकसान होत नाही, नुकसान होते ते फक्त आपल्याच मनाचे आणि शरीराचे.

तात्पर्य : राग दुसऱ्याला शिक्षा देण्यासाठी नाही, तर तो स्वतःलाच दिलेली शिक्षा असते.

आत्मशक्ति



एखादी वावटळ यावी तसे आमच्या मनात संताप, असत्य, कामुकता, लोभ, लालसा आणि अहंकार यांचे नकारात्मक भाव घोंगावत असतात.अशा ह्या नकारात्मक विचारांना आम्ही संपविले अथवा ताब्यात आणले तर आमचे मन समतोल आणि शांत होईल आणि आमच्या ध्यानाभ्यासात प्रगति होईल. जर आम्ही ह्या आवरणांना दूर केले तर आमचे मन शांत अवस्थेत जाईल. कारण ही गोष्ट ध्यानाभ्यासासाठी आवश्यक आहे. अशाने क्रोधाची काळी छाया जी आत्मीय प्रकाशास झाकते ती दूर होईल. आपल्या अवगुणांच्या प्रति जागृत होणेआपल्या आत्म्यावरील आवरणे दूर करावयाचे पहिले पाऊल म्हणजे आपल्या अवगुणांबाबत आम्ही सावध झालो पाहिजे. आम्ही डॉक्टरांकडे जातो तेव्हा रोगाचे निदान

अध्यात्मिक शक्ती

झाल्याशिवाय आम्ही पूर्णपणे स्वस्थ होत नाही. जेव्हा आम्ही शिक्षकांकडे जातो तेव्हा त्यांना आमच्या बुद्धिमत्तेची पारख आम्हाला काही शिकविण्यापूर्वीच करावी लागते. जेव्हा आम्ही क्रीडाशिक्षकांकडे जातो, आमच्या सामर्थ्याची तपासणी होते तेव्हाच आम्हाला त्यात प्राविण्य मिळविण्याच्या पद्धती सांगितल्या जातात. अशाच प्रकारे आमचे दोष घालविण्या अगोदर आमच्यात कोणकोणते दोष आहेत ह्याचा आम्ही पूर्णपणे शोध घेतला पाहिजे.

अनेक संत, महापुरुषांनी आणि ज्ञानवंतांनी अवगुणांची मीमांसा अगदी योजनापूर्वक व प्रयत्नपूर्वक केली आहे. दररोज ते आपल्या विचारांचा, बोलण्याचा व आचारांचा पडताळा घेत. सदाचाराचे नियम पाळण्यात जर काही चूक झाली तर दुसऱ्या दिवशी त्यात सुधारणा करण्याचा ते निर्णय घेत. एक फारशी महात्मा ख्वाजा हाफिज होते. आपल्या प्रत्येक चुकामागे एकेक खडा घड्यात टाकीत असत. रात्री तो भरलेला घडा पाहून निराश होत. काही भारतीय ज्ञानवंत जेव्हा सदाचारापासून ढळले जात तेव्हा घड्यात छोटा दाणा टाकीत, वा आपल्या प्रत्येक चुकीकरता आपल्या कपड्यास एकेक गाठ बांधीत व शेवटी त्यांची मोजदाद करीत. संत ख्रिश्चन इग्नेशियस लयोला यांनी माणसाने दिवसभर केलेल्या चुकांचे परीक्षण करावयास हवे असे सुचविले आहे. ते म्हणत की आम्ही ईश्वराची प्रार्थना करावी की आम्ही किती वेळा चुका केल्या ह्यांची त्याने आम्हाला आठवण द्यावी. झाल्या चुकांबद्दल आपण त्याची क्षमा मागितली पाहिजे. तसेच पुढील दिवसापासून अशा चुका दुसऱ्यांदा न करण्याबाबत प्रयत्न करावयास पाहिजे.

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय : जर मी एखाद्यासाठी खूप काही केलं आहे पण त्याच्याकडून तितकाच चांगला प्रतिसाद मिळत नाही. याचा अर्थ, माझा आणि त्याचा एखाद्या मागच्या जन्मातला हिशोब बाकी आहे असा होतो का?

सुरेश ओबेरॉय : माझ्या ज्योतिषाने मला सांगितलं होतं की, तुम्ही इतरांसाठी खूप कराल, पण त्याबदल्यात तुम्हाला काही मिळणार नाही. - हे ऐकून मला खूप वाईट वाटलं होतं आणि आयुष्य किती अन्यायकारक आहे असा विचार केला होता. यासाठी मी देवाला आणि विश्वाला दोष दिला होता.

शिवानीदीदी :

ऊर्जेची देवाण-घेवाण म्हणजे देणं आणि घेणं. आपल्यातले काही ऋणी असू शकतात. समजा, तुम्ही माझ्यासाठी खूप काही केलं होतं. तुमचे सकारात्मक तरंग मला सूक्ष्म रूपात मिळाले आणि बाह्य रूपात तुमचं सहकार्य आणि मदत मिळाली. अशा प्रकारे

नाती घट्ट विणू या

आपल्यामध्ये ऊर्जेची देवाण-घेवाण झाली. त्यानंतर एक काळ असा येईल जेव्हा आपण दोघंही आपला शरीररूपी पोशाख बदलू, म्हणजेच आपण पुनर्जन्म घेऊ. नवीन आयुष्यात किंवा त्यानंतरच्या आयुष्यात, पूर्वीच्या त्या कर्जाची परतफेड करण्यासाठी आपण नात्यांचं नवीन लेबल घेऊन एकमेकांच्या संपर्कात येण्यासाठी बांधील असू.

सुरेश ओबेरॉय : आपण मित्र, भावंड किंवा नातेवाईक यांच्या रूपात असू शकतो.

शिवानीदीदी : हो, कोणत्याही. मी तुमचं मूलही असू शकते.

सुरेश ओबेरॉय : त्या ज्योतिषाने माझं भविष्य सांगताना एका वाक्याची भर घालायला हवी होती - तुम्हाला इतरांना द्यावंच लागेल कारण मागच्या जन्मात तुम्हाला त्यांच्याकडून खूप काही मिळालं आहे. तुम्ही तुमचं कर्ज फेडत आहात, त्यामुळे तुम्ही आनंदी असायला हवं.

शिवानीदीदी : हे दुसऱ्या वाक्यात बदलू या : इतरांना देणं हा तुमचा संस्कार आहे त्यामुळे त्या मोबदल्यात तुम्हाला काय मिळेल त्याचा हिशोब न ठेवता त्यांच्यासाठी चांगल्या गोष्टी करत राहा.

सुरेश ओबेरॉय : आमच्याकडे घरी पहारा द्यायला एक कुत्रा आहे. जेव्हा दरवाजावर कोणी येतं तेव्हा आम्हाला ते कळवणारा तो पहिला असतो. घरातील नोकरांनी आम्हाला कळवण्याची वाट तो बघत नाही. लोकांना बिनशर्त देत राहण्याची कला आपण प्राण्यांकडूनही शिकू शकतो.

शिवानीदीदी : तुमच्याकडचा पाळीव प्राणी त्याच्या संस्कारांप्रमाणे वागतो.सुरेश ओबेरॉय : असं करणं हे त्याचं कर्तव्य आहे, हो ना!

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

आई : दिवसभर मोबाइलमध्ये काय बघतोस ?

मुलगा : आई, तुझ्या लग्नाचे फोटो यात कुठे आहेत ते शोधतोय, तू तर म्हणायचीस की लग्नात फोटो काढायलाही पैसे नव्हते.

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* नोबेल पारितोषिक कोणत्या देशात दिले जाते?

- स्वीडन आणि नॉर्वे देशात

- अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

याकरिता मातेने डॉक्टरांकडून आहाराची व आयुर्वेदिक औषधांची योजना करून घ्यावी, कारण या महिन्यात गर्भवतीचे बल व वर्ण यांची हानी होऊ शकते. बाळाचा रंग गोरा, उजळ होण्यासाठी गर्भवती स्त्रीने दूध, तूप, शिरा, ताक, लोणी, भात, केशरयुक्त दूध, सुवर्णसिद्धजल यांचा आहारात वापर करावा. केशर अति प्रमाणात वापरू नये. ते उष्णगुणात्मक असते. केशराच्या १ ते २ काड्या दुधातून घ्याव्यात. या महिन्यात बाळाच्या त्वचेवर केस येऊ लागतात. बाळ पापण्यांची हालचाल करून डोळे उघडझाप करते. हातापायाचे ठसे दिसू लागतात.

गर्भलांबी : १० इंच, गर्भवजन : ६०० ग्रॅम.

सातवा महिना : सप्तमे मासे गर्भः सर्वैः भावैः आप्यायते । गर्भिणी क्लान्ततमा भवति । - चरक शारीरस्थान

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

(४-२३) या महिन्यामध्ये गर्भाचे सर्व अवयव अंग प्रत्यंग तयार झालेले असतात. त्यामुळे या महिन्यात गर्भवतीला थकवा येतो. या महिन्यात बाळ डोळ्यांची उघडझाप करते आणि त्याचा अंगठा चोखते, बाळ हाता-पायांची हालचाल करून त्याचा तो एक प्रकारचा व्यायाम करतो. जर बाहेर मोठा आवाज झाला, तर बाळ त्याला प्रतिसाद देते. या महिन्यात बाळाचा जन्म झाला, तर ते मध्ये ठेऊन जगू शकते. गर्भलांबी : १५ इंच, गर्भवजन : १००५ ग्रॅम.

आठवा महिना :अष्टमे अस्थिरो भवति ओजः।तत्र जातश्चेत् जीवेत् निरोजस्त्वात् नैर्ऋत्य भागत्वाच। - सुश्रुत शारीरस्थान (६-३०) आयुर्वेदामध्ये समधातूंचा सार म्हणजे ओज ही संकल्पना सांगितलेली आहे. थोडक्यात ओज म्हणजे तेजस्वरूप शक्ती. या महिन्यामध्ये प्रसूती होणे धोक्याचे असते.

या महिन्यात चुकून प्रसूती झाली, तर बाळ-आई यापैकी ज्याच्याकडे ओज असेल त्याच्या जीवाला धोका पोहचत नाही; आठव्या महिन्यातील वाढ परंतु ज्याकडे ओज नाही त्याच्या जीवाला धोका पोहोचू शकतो. आता आधुनिक काळात सुसज्ज अशी उपकरणे, मशिनरीज आल्यामुळे माता व बालमृत्यूचे प्रमाण कमी झालेले आहे. या महिन्यात बाळाच्या मेंदूची वाढ जास्त प्रमाणात होते. आईला बाळाची हालचाल खूप जाणवते. **(क्रमशः)**

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

नगरमध्ये २१ व २२ नोव्हेंबरला फुटबॉल सुपर लीगचे आयोजन

पुणे येथील क्लबचे निवड समिती सदस्य राहणार उपस्थित; आठ संघांतील १०५ खेळाडूंचा नगर क्लबच्या मैदानावर थरार

नगर – शहरातील फुटबॉल खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांच्या क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीग (ए.एफ.एस.एल.) २०२६ च्या पाचव्या पर्वाची तयारी आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने आयोजित करण्यात येणारी ही स्पर्धा २१ व २२ नोव्हेंबर रोजी नगर क्लबच्या मैदानावर रंगणार आहे. दिवस आणि रात्री अशा दोन सत्रांमध्ये फ्लडलाइटच्या प्रकाशात सामने खेळविण्यात येणार आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन २१ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी होणार आहे. यंदाच्या स्पर्धेत आठ संघांमधील १०५ खेळाडू सहभागी होणार आहेत. विजेतेपदासाठी संघांमध्ये होणारी चुरस, खेळाडूंचे तंत्रकौशल्य, वेगवान खेळ आणि गोल करण्यासाठीची धडपड यामुळे स्पर्धेत चांगलीच रंगत निर्माण होण्याची अपेक्षा आहे. स्थानिक फुटबॉलपटूंना व्यावसायिक पद्धतीने खेळण्याची संधी मिळावी, त्यांच्या गुणवत्तेला योग्य व्यासपीठ मिळावे आणि अहिल्यानगरमध्ये फुटबॉल संस्कृती अधिक मजबूत व्हावी, या उद्देशाने गेल्या चार वर्षांपासून या लीगचे आयोजन करण्यात येत आहे.

दोन दिवस खेळाडूंच्या कामगिरीचे निरीक्षण

यंदाच्या पाचव्या पर्वाचे विशेष आकर्षण म्हणजे पुण्यातील सिटी पुणे फुटबॉल क्लब आणि पुणे पायोनिअर्स फुटबॉल क्लबचे निवड समिती सदस्य स्पर्धेसाठी उपस्थित राहणार आहेत. ते दोन दिवस खेळाडूंच्या कामगिरीचे निरीक्षण करून उत्कृष्ट खेळाडूंची निवड करणार आहेत. निवड झालेल्या गुणवंत खेळाडूंना संबंधित क्लबच्या संघात स्थान मिळविण्याची तसेच व्यावसायिक प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे अहिल्यानगरमधील खेळाडूंना शहराबाहेरील मोठ्या फुटबॉल व्यासपीठावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे. ही स्पर्धा केवळ मनोरंजन किंवा स्थानिक पातळीवरील स्पर्धा न राहता खेळाडूंच्या भविष्यातील वाटचालीसाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार असल्याची माहिती नमोह फुटबॉल क्लबच्या ओनर नमिता फिरोदिया यांनी दिली.

स्थानिक खेळाडूंना मिळणार व्यावसायिक स्पर्धेचा अनुभव

स्पर्धेपूर्वी नुकताच खेळाडूंचा लिलाव पार पडला. या लिलावामध्ये शहरातील गुणवंत फुटबॉलपटूंना आपल्या संघात घेण्यासाठी संघमालकांमध्ये चांगलीच चुरस पाहायला मिळाली. खेळाडूंच्या कौशल्याचा विचार करून संघमालकांनी त्यांच्यावर लाखो रुपयांची बोली लावली. या प्रक्रियेमुळे स्थानिक खेळाडूंना व्यावसायिक फुटबॉल स्पर्धेचा अनुभव मिळण्याबरोबरच त्यांच्या गुणवत्तेला आर्थिक आणि क्रीडाक्षेत्रातील महत्त्व प्राप्त होत आहे.

आठ संघ विजेतेपदासाठी मैदानात

यंदाच्या स्पर्धेत एमडी अँड आरडीएक्स इन्फ्रा, गुलमोहर चॅलेंजर्स, गांधी वॉरियर्स, डायनामिक स्ट्रायकर, एक्सलन्स अचिव्हर्स, विद्यादान अल्फा एक्स, डॉक्टर बायो आणि नवा मराठा योद्धा हे आठ संघ विजेतेपदासाठी मैदानात उतरणार आहेत. या सर्व संघांमध्ये मिळून शहरातील १०५ खेळाडूंचा समावेश आहे. संघमालक म्हणून ऋत्विक वाबळे, जोएब खान, चेतन गांधी, सिद्धार्थ मुनोत, आशिष टोटू, रोहित रामदिन, सचिन सेलोत, ॲड. ललित गुंदेचा, अभिनंदन आणि रुही भन्साळी हे जबाबदारी सांभाळत आहेत.

स्पर्धेच्या आयोजनासाठी विविध संस्थांचे सहकार्य

स्पर्धेच्या आयोजनासाठी विविध संस्थांचे सहकार्य लाभत आहे. अभिनंदन आणि रुही भन्साळी (अवित्री मोशन) हे को-पॉवर, राजेश भंडारी (महावीर ग्रुप) किट स्पॉन्सर, तर प्रणिल मुनोत (कॉनप्लेक्स) को-स्पॉन्सर आहेत. याशिवाय राम एजन्सी, शिवम सायकल, फन्की लॅण्ड, अमित ट्रेडर्स, जलाराम फुड्स आणि खेलोफाय यांचेही सहकार्य लाभले आहे. नगर क्लबच्या मैदानावर स्पर्धेच्या आयोजनासाठी आवश्यक तयारी वेगाने सुरू आहे. दिवसाच्या सामन्यांसोबतच रात्री फ्लडलाइटच्या प्रकाशातही सामने खेळविण्यात येणार आहेत. यामुळे प्रेक्षकांना दिवसा आणि रात्री फुटबॉलचा थरार अनुभवता येणार आहे. दुसरीकडे, सहभागी खेळाडूंचा सराव भाऊसाहेब फिरोदिया यांच्या मैदानावर सुरू असून, सर्व संघ अंतिम तयारीला लागले आहेत.

प्रेरणादायी अक्षरधन

मनाच्या खिडक्या उघड्या हव्यात



पूर्वी प्रत्येक राजाला एक हवामहल असे. महालात खूप हवा खेळावी, मन या उल्हासित राहावे, काम करायला उत्साह यावा हा त्यामागे, उद्देश असे. महालाला खूप खिडक्या असत. दारांचीही संख्या मोठी असे. आतली दुर्गंधी, अपायकारक दूषित हवा आणि कीटक नष्ट व्हावेत हे मनाशी ठरवूनच हा महाल बांधला जाई.

माणसाचे मन हाही एक महालच आहे. प्रचंड मोठा. पण त्यात स्वार्थाची दुर्गंधी केवढी, राग द्वेषाची जळमटे तरी किती, लोभ, मोह, माया, मत्सर यासारख्या विषारी जीवाणूंची तरी केवढी बेधडक वर्दळ. त्यामुळे मन सततच्या कोंडमाऱ्याने गुदमणार, विषारी जीवाणूंच्या डंखांनी घायाळ होणार. कसे वाचेल ते, कसे होईल सुखी. मोकळे स्वच्छ आणि आनंदी ? हा मनाचा महालही व्हावा त्यासाठी हवाई. खूप असाव्यात खिडक्या, प्रचंड संख्या असावी दारांची. मग आत खेळावेत निःस्वार्थ वारे, बाहेर जावेत दुर्गंध सारे. पळून जावेत दूर दूर जिवाच्या आकांताने राग द्वेषाचे दुष्ट किडे. मग हे स्वच्छ मन, झटेल सर्वांच्या कल्याणासाठी गुंडाळून स्वार्थ, साधीत परमार्थ, सेवाबुद्धी साधेल मग समृद्धी सर्वांची.

बहुधा लोकांना मी तुझा हा वाक्प्रचार आवडत नाही. तू माझाच हीच बहुतेकांची आवडती भाषा. मी तर माझा आहेच, पण तुही माझाच हाच सगळ्यांच्या अंतरी ध्यास. खरे तर आपणच व्हावे, त्या परमकल्याणकारी तत्त्वाचे दास. मी माझा नसे तर केवळ परोपकारासाठी असे हीच भावना वर्तावी. आद्य शंकराचार्य म्हणतात.

सत्यपि भेदापगमे नाथ
तवाहं न मामकिनस्त्वम ।
समुद्रो हि तरङ्गः क्वचन समुद्रो न
तारङ्गः ।।

हे जगन्नाथा, मी तुझा आहे. पण म्हणून तू माझा आहेस अशी हक्काची भाषा मी बोलणार नाही. कारण हक्क तुझाच आहे माझ्यावर, हे समाजपुरुषा, तुझ्यामुळेच आहे मला अस्तित्व आणि सुखीत्व. मग माझा हक्क नसेच तुझ्यावर. समुद्रावर तरंग उठतात. समुद्र पाहावा. तर वर नुसते तरंगच दिसतात. पण हे तरंग त्याचे अंतरगं नव्हे. तरंग ही समुद्राची निर्मिती. तरंग समुद्राचे पण समुद्र तरंगांचा नाही. तसा मी समाजाचा, पण म्हणून समाज माझ्यामुळे नाही. समाजाने मला सामावून घेतले म्हणून समाजालाच मी आपले गुलाम बनविले, असे शोभणार नाही. टिकणार नाही. मनाच्या खिडक्या उघड्या असल्या की हे सारे उमजते. मग आनंदाचे द्वार मनाला उल्हासित करते. तुकोबाही अशीच समुद्राचीच उपमा देतात.

तुजमज ऐसी परी। जैसे तरंग सागरी ।।
तुका म्हणे फार थोडा कमी परउपकार।।

कोण कुणाचा? कोण कुणाचा सेवक व्हावा? हे समजून धरावा बोध चित्ती. माझी उत्पत्ती जगापाठी, जग नव्हे माझ्यासाठी ही भावना भिनली की मनाच्या खिडक्या सताड उघड्या होतात. केवळ आनंद मग चोहीकडे भरून उरतो.

- किशोर गांधी

सदगुरु श्री शंकर महाराज प्रकट दिन सोहळा उत्साहात



नगर – मंगल दत्तक्षेत्र, एफ ७०, एमआयडीसी, अहिल्यानगर येथे श्री विश्वेश्वर स्वामी महाराज, अध्यक्ष मंगल भक्त सेवा मंडळ ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनातून सदगुरु श्री शंकर महाराज प्रकट दिन सोहळ्यास सकाळ पासूनच सनई, चौघडा, तुतारी या पारंपारिक वाद्यात सुरुवात झाली. यात श्रीं चा अभिषेक, श्री शंकरगीता पारायण, श्रीं चा पाळणा, श्रीं ची आरती, श्रीं चा पालखी सोहळा त्यानंतर महाप्रसाद, दर्शन सोहळा व आपल्या मंडळाची भजने तसेच सायंकाळी सालासार सत्संग मंडळ, हनुमान मंदिर, झेंडीगेट अहिल्यानगर या पुरुष वर्गानी गाजवलेला सुंदरकांड भजनसंध्याचा कार्यक्रम यामुळे हा सोहळा मंगलमय, भक्तीमय, अशा प्रफुल्लित वातावरणात व आनंदोत्सवात झाला.

याप्रसंगी एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत थोरात व त्यांचे सहकारी तसेच कथाकार समाधान महाराज शर्मा, त्यांचे बंधू व सहकारी तसेच सालासार सत्संग मंडळ परिवारातील अनिल झंवर यांचा सन्मान श्री विश्वेश्वर स्वामी महाराज तसेच मंडळाचे सेवेकरी यांच्या हस्ते करण्यात आला.

विविध ठिकाणांवरुन उपस्थित राहिलेले भाविक-भक्तगण, मंगल भक्त परिवारातील सर्व सेवेकरी, बालगोपाळ सर्वांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा वाढली. तसेच विविध ज्ञात-अज्ञात व्यक्तींचे हात आणि श्री शंकर महाराजांप्रती प्रत्येकाची असलेली श्रद्धा व भावना आणि सर्वांच्या सहकार्यामुळे हा सोहळा अवर्णनीय ठरला.

राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत नगरच्या सलोनी प्रसादने पटकावले सुवर्णपदक



नगर – जम्मू-काश्मीर येथे आयोजित ७० व्या शालेय राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत अहिल्यानगरच्या सलोनी प्रसाद हिने सुवर्णपदक पटकावली आहे. या स्पर्धेत संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातून सुवर्णपदक मिळवणारी ती एकमेव खेळाडू ठरली आहे.

सलोनी ही स्टार तायक्वांदो अकॅडमीची खेळाडू आहे. तिच्या या यशामागे दररोज चार ते पाच तासांचा कठोर सराव, घाम गाळण्याची तयारी, शिस्त आणि अनेक सुखसोयींचा केलेला त्याग आहे. सातत्यपूर्ण मेहनत आणि जिद्दीच्या बळावर तिने राष्ट्रीय स्तरावर सुवर्णयश संपादन केले आहे.

सलोनीच्या सुवर्णपदकापर्यंतच्या प्रवासात तिचे मुख्य प्रशिक्षक गणेश धीवर यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. तसेच स्टार तायक्वांदो अकॅडमीचे प्रशिक्षक रवी यादव, विशाल जंजाळ, सुनील धीवर, आकांक्षा दराडे आणि वैष्णवी कदम यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे व प्रोत्साहनामुळे तिला हे यश मिळवता आले.

सलोनीने स्पर्धेतील प्रत्येक फेरीत आपल्या कौशल्याची आणि आत्मविश्वासाची छाप पाडली. पहिल्या सामन्यात पंजाबच्या खेळाडूवर सहज विजय मिळवला. त्यानंतर मणिपूरच्या खेळाडूचा १५-० अशा एकतर्फी गुणफरकाने पराभव करत आपले आक्रमक कौशल्य सिद्ध केले. पुढील फेरीत मध्य प्रदेशच्या खेळाडूवर मात केल्यानंतर उपांत्य फेरीत उत्तराखंडच्या खेळाडूला ८-३ आणि १०-२ अशा गुणफरकाने पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश केला.

अंतिम सामना दिल्लीच्या बलाढ्य प्रतिस्पर्धी खेळाडूविरुद्ध होता. सुरुवातीला ०-३ अशा गुणफरकाने पिछाडीवर पडल्यानंतरही सलोनीने हार मानली नाही. संयम, आत्मविश्वास आणि जिद्दीच्या जोरावर तिने सामन्यात जोरदार पुनरागमन केले. ९-३ अशी आघाडी घेत अखेर १२-३ अशा दणदणीत गुणफरकाने विजय मिळवत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

या यशाबद्दल महाराष्ट्र तायक्वांदो संघटनेचे अध्यक्ष अविनाश बारगजे, जिल्हा सचिव संतोष बारगजे, मार्गदर्शक शकील सय्यद, शहर संघटनेचे सचिव सुरेश वाघ, अध्यक्ष संजय शिंदे, स्टार तायक्वांदोचे अध्यक्ष अण्णासाहेब शिंदे, तसेच सूरज शिंदे, शुभम बागल आणि आसिफ शेख यांनी तिचे अभिनंदन केले.

कृत्रिम बुद्धिमत्तेला ही हरवणारे बुद्धिबळपटू ठरले विजेते

शौनक बडोले नागपूर प्रथम, श्रीराज भोसले कोल्हापूर द्वितीय! शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुल्या आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा समारोप



नगर – अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुल्या आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा समारोप झाला. देशभरातून २५० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत शौनक बडोले नागपूर याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला, तर श्रीराज भोसले कोल्हापूर याने द्वितीय क्रमांक मिळविला. महाराष्ट्रालाच विजयते व उपविजेतेपद मिळाल्यामुळे खेळाडूंमध्ये उत्साह होता. जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, एस.टी. स्टँड रोड येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे सर्वांत मोठे आकर्षण ठरले ते चीनमधून आणण्यात आलेला अत्याधुनिक बुद्धिबळ खेळणारा रोबोट. या रोबोट ने प्रत्यक्ष खेळाडूंशी बुद्धिबळा चे डाव खेळल्याने स्पर्धेला आधुनिक तंत्रज्ञानाची अनोखी जोड मिळाली. अहिल्यानगर मध्ये प्रथमच बुद्धिबळ प्रेमींना कृत्रिम बुद्धिमत्ते वर आधारित यंत्रमानवा सोबत खेळण्याची संधी मिळाली. या रोबोट समोरही खेळाडूंनी आपले कौशल्य पणाला लावत बुद्धिमत्तेची चुरस अनुभवली. अवघ्या साडेचार वर्षांच्या बाल खेळाडू पासून ते ८७ वर्षांच्या ज्येष्ठ खेळाडू पर्यंत विविध वयो गटांतील स्पर्धकांनी सहभाग घेतल्याने स्पर्धेचे स्वरूप विशेष ठरले.

नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, अहिल्यानगर मधून बुद्धिबळ खेळाचा प्रचार आणि प्रसार सातत्याने होत असून, दरवर्षी आयोजित होणाऱ्या स्पर्धांना खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. खेळाडूंना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शंभरहून अधिक आंतरराष्ट्रीय दर्जाचे वूडन बुद्धिबळ बोर्ड उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. त्याचबरोबर चीनमधील अत्याधुनिक बुद्धिबळ रोबोट आणून खेळाडूंना आधुनिक तंत्रज्ञानाचा अनुभव देण्यात आला. भारतात शंभरहून अधिक ग्रँडमास्टर झाले असून, अहिल्यानगर मधून ही आणखी एक ग्रँडमास्टर घडविण्यासाठी जिल्हा बुद्धिबळ संघटना कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी नरेंद्र फिरोदिया, उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी, सचिव यशवंत बापट, सुबोध ठोंबरे, शाम कांबळे, पारुनाथ ढोकळे, संजय खडके, प्रकाश गुजराथी, स्वप्निल भगुरकर, विशाल गुजराथी, दत्ता घाडगे, संजय जोशी, मनीष जसवानी, चेतन कड, विजय चोरडिया, राजीव बोधक,पंच प्रवीण ठाकरे, पवन राठी, शार्दुल तापसे, शिशिर इंदुरकर, विजय चोरडिया, प्रशांत धंगेकर, देवेंद्र ढोकळे, अनुराधा बापट, शुभदा ठोंबरे आणि रोहिणी आडकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

बक्षीस वितरण समारंभास संघटनेचे पदाधिकारी, खेळाडू, पालक आणि बुद्धिबळप्रेमी उपस्थित होते.

स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे – प्रथम- शौनक बडोले, द्वितीय- श्रीराज भोसले, तृतीय- हर्ष घाडगे, चतुर्थ- अडलजा वनशहा, पाचवे- मॉक्सिट शहा, सहावे- तनिष्क कुमार, सातवे- ईश्वरी जगदाळे, आठवे-सई शर्मा, नव्वे- सोहेल शेख, दहावे- ए बालकृष्णा, अकरावे- रोमित जाडे, बारावे- मोहन जाडे, तेरावे- आयुष कोटेचा, चौदावे- शुभम चांडक, पंधरावे- अमय दांडेकर,

बेस्ट १८०० – प्रथम- श्रीराम म्हसणे, द्वितीय- अनय पिंपरकर, तृतीय- सानवी गोरे, चतुर्थ- कृणाल सोलंकी, पाचवे- आर्यन चाक्रबोर्थ, सहावे- जीत बोरीसा, सातवे- पंकज बोरसे, आठवे- निलनता चंदा, नव्वे- सुयोगकुमार पटेल, दहावे- प्रणव जाध्वर,

बेस्ट १६०० – प्रथम- तनिष्का राठी, द्वितीय- शिवप्रसाद काळे, तृतीय- अभिजीत घाणेकर, चतुर्थ- अक्षता जैन, पाचवे- कर्सेन मनस, सहावे- कुशान चौधरी, सातवे- तनय कावळे, आठवे- व्यंकटेश करणंव, नव्वे- कृष्णा कुलकर्णी, दहावे-किरणकुमार इंगळे,

बेस्ट अनरेटेड कॅटेगिरी – प्रथम- हरऋषिकेश राठोड, द्वितीय- जय पवार, तृतीय- अनया पिसे, चतुर्थ- सचिन देशपांडे, पाचवे- काव्या सोनेकर, सहावे- सचिन वंजारे, सातवे- अंश जोशी, आठवे- अपूर्वा फटांगरे, नव्वे- अजिंक्य क्षीरसागर, दहावे- दैविक देखणे,

ज्येष्ठ सर्वोत्तम खेळाडू – प्रथम- सुनील जोशी, द्वितीय- अशोक ससाने, तृतीय- हरिहर सुब्रमण्यम, चतुर्थ- सूर्याजी भोसले, पाचवे- सखाराम सोनवणे, सहावे- पद्माकर करणकर, सातवे- देवेंद्र चांचाणी, आठवे- बलभीम कांबळे, नव्वे- लालगोविंद कोळपेकर, दहावे- नातू सोमवंशी,

उत्कृष्ट महिला खेळाडू – प्रथम- मेहेक कटारिया, द्वितीय- श्रिया हिप्परगी, तृतीय-श्रावणी आंधळे, चतुर्थ- शर्वरी देशमुख, पाचवे- लाव्या मेनोन,

बेस्ट अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडू – प्रथम- ईशान चोरडिया, द्वितीय- जिनम संकलेचा, तृतीय- हिमांशू मखीजा, चतुर्थ- अश्विन चंगेडिया, पाचवे- आर्यन देवकर,

बेस्ट अहिल्यानगर तालुक्यातील खेळाडू – प्रथम- आय्या आयुष, द्वितीय- सार्थक शिंदे, तृतीय- आदेश देखने, चतुर्थ- पार्थ झवर, पाचवे-

बेस्ट १६ वर्षाखालील खेळाडू – प्रथम- निशांत जवळकर, द्वितीय- प्रीजेश वेलीयेतंपरमबील, तृतीय-आदिराज मेहत्रे, चतुर्थ- ओजस हिवरे, पाचवे- दिव्यान महाजन,

बेस्ट १३ वर्षाखालील खेळाडू – प्रथम- मण्या द्रोलिया, दुतीय- मारस सिंग, तृतीय- वरद पाटील, चतुर्थ- श्रीयश कुदळे, पाचवे- चाक्रबोर्टी आयन,

बेस्ट १३ वर्षा खालील खेळाडू – प्रथम- स्वराज विश्वास, दुतीय- अभेद्य दायमा, तृतीय- सोमकुवर, चतुर्थ- रूद्र, पाच- यश दामोधर,

बेस्ट १० वर्षाखालील खेळाडू – प्रथम- मनीष जावळकर, द्वितीय- दर्श राऊत, तृतीय- आण्वित गायकवाड, चतुर्थ- राहुल ढवळे, पाचवी- अनया जोशी,

बेस्ट १० वर्षाखालील खेळाडू – प्रथम-जहान गुप्ता, द्वितीय- शरवी भांगूरकर, तृतीय- आयुष घुगे, चतुर्थ- शाम प्रदीप, पाचवे- जगांक पाटील,

बेस्ट ०७ वर्षाखालील खेळाडू – प्रथम- दुर्वेश ठाकूर, द्वितीय- स्वराज हेंड, तृतीय- इरीशा हिरे, चतुर्थ- आशिष कुमार.



नेवासकर रॉयल एनफिल्डची एकाच दिवशी ७५ दुचाकींची विक्रमी विक्री

दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर सन २०१० पासून ग्राहकांच्या विश्वासाची परंपरा जपणाऱ्या केडगाव येथील नेवासकर रॉयल एनफिल्ड शोरूममध्ये तब्बल ७५ रॉयल एनफिल्ड दुचाकींची विक्रमी विक्री झाली आहे. रॉयल एनफिल्डची शाही थाटाची बुलेट ३५०, क्लासिक ३५० यांसह विविध आकर्षक मॉडेल्सना ग्राहकांनी पसंती दिली. कमी डाऊन पेमेंट, आकर्षक फायनान्स सुविधा आणि सुलभ मासिक हप्त्यांच्या सुविधेमुळे ग्राहकांना दुचाकी खरेदी करणे अधिक सोयीचे झाले. यंदाच्या फेस्टिव्हल धमाका ऑफरमध्ये रॉयल एनफिल्डची सुरुवातीची किंमत १ लाख ३८ हजार ९९८ रुपयांपासून उपलब्ध होती. केडगाव इंडस्ट्रियल इस्टेट, नगर-पुणे रोड येथे असलेल्या या शोरूमसोबतच संगमनेर, कोपरगाव आणि श्रीगोंदा येथेही नेवासकर ऑटोमोबाईल्सच्या शाखा कार्यरत आहेत. माहितीसाठी आणि बुकिंगसाठी ८४४६३००३०० किंवा ८७९३८००९०० या क्रमांकावर संपर्क साधावा.

दिवाळी पाडव्याला वासन टोयोटामध्ये एकाच दिवसात २५ कारची विक्री



नगर – केडगाव येथील वासन टोयोटामध्ये दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर एकाच दिवशी तब्बल २५ कारची विक्रमी विक्री करत वासन टोयोटाने लक्षवेधी कामगिरी नोंदवली आहे. या प्रसंगी अहिल्यानगर जिल्हा बँकेचे संचालक सचिन जगताप यांच्यासह विविध राजकीय नेतेमंडळी, नागरिक आणि ग्राहक उपस्थित राहून नव्या कारच्या खरेदीत सहभागी झाले.

या वेळी संचालक जनक आहुजा यांनी उपस्थित ग्राहक आणि नागरिकांना दिवाळीच्या शुभेच्छा देत ग्राहकांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल आभार व्यक्त केले. यंदा ग्राहकांसाठी टोयोटा हायरायडर या गाडीवर २ लाख रुपयांपर्यंतचे फायदे, १०० टक्के ऑन-रोड फायनान्सिंग आणि प्रति लिटर २७.९७ किलोमीटरपर्यंतच्या मायलेजचा दावा विशेष आकर्षण ठरत आहे. तसेच अत्याधुनिक इलेक्ट्रिक कार टोयोटा अर्बन क्रूझर एबेलाच्या खरेदीवर घरासाठी मोफत सोलर संचाची खास भेट दिली जात असून या इलेक्ट्रिक कारमध्ये एका चार्जिंगमध्ये ५४३ किलोमीटरपर्यंतची रेंज आणि बॅटरीवर ८ वर्षांची वॉरंटी मिळत आहे.

या सोहळ्यात अनिश आहुजा यांनीही ग्राहकांना विविध कार मॉडेल्सची सविस्तर माहिती दिली. वाहनांची वैशिष्ट्ये, आधुनिक तंत्रज्ञान, इलेक्ट्रिक वाहनांचे फायदे आणि उपलब्ध सवलती याबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी ग्राहकांनी वासन टोयोटा, इंडस्ट्रियल इस्टेट, नगर-पुणे रोड, केडगाव, अहिल्यानगर येथे किंवा ९८५२५ १२३४४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे २८ नोव्हेंबर रोजी आयोजन

नगर – जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर व संगमनेर महाविद्यालय, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने २८ नोव्हेंबर रोजी जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन संगमनेर महाविद्यालय, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर या ठिकाणी सकाळी ९ वाजता करण्यात आले आहे. युवकांचा सर्वांगीण विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्तगुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागणे यासाठी प्रतिवर्षी राष्ट्रीय व राज्यस्तरा वर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. राज्यात सन २०२६-२७ या वर्षातील जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे.

युवा महोत्सवामधील स्पर्धात्मक बाबी म्हणजे लोकनृत्य, पथनाट्य व लोकगीत गटामध्ये १० जण सहभागी होऊ शकतात, तर लोकनृत्य व लोकगीत यामध्ये निर्धारित संख्येमध्ये वाद्यवृंद संख्या अंतर्भूत राहील. चित्रकला स्पर्धेत दोघे तर कविता लेखन स्पर्धेत एक जण सहभागी होऊ शकतात.

या स्पर्धेमध्ये सहभागासाठी १७ ऑगस्ट रोजी किमान १५ वर्ष ते कमाल २९ वर्ष वय असणाऱ्या युवक व युवती यांना प्रवेश देण्यात येईल. तसेच स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या स्पर्धकांना रोख पारीतोषिक व प्रमाणपत्र देण्यात येईल व विभागीय, राज्य तसेच राष्ट्रीय युवा मोहत्सवामध्ये सहभागी होण्याची संधी प्राप्त होईल. सदर युवा महोत्सवामध्ये जिल्ह्यातील शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, महिला मंडळ तसेच १५ ते २९ वयोगटातील युवांनी गुगल फॉर्म द्वारे २५ नोव्हेंबरपर्यंत आपला प्रवेश निश्चित करावा. जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये जिल्ह्यातील युवक व युवती यांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे.

तारकेश्वर गड येथे २१ नोव्हेंबर रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीर

नगर – एच. व्ही देसाई नेत्र रुग्णालय, पुणे व केडगाव येथील हरीहरेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण व जिव्हाळा जेष्ठ नागरिक, अपंग, अनाथ, निराधार मंच, अंजली चष्मावाला यांच्या वतीने प्रतिष्ठाणचे अध्यक्ष डॉ. चेमटे श्रीकांत यांना २१ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ ते २ वाजेपर्यंत मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन तारकेश्वर गड, महिंदा, ता. आष्टी जि बीड येथे केले आहे. या शिबीरामध्ये एच. व्ही. देसाई हॉस्पिटल पुणे येथील तज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करुन डोळ्यांच्या समस्यावर योग्य मार्गदर्शन व औषधोपचार केले जाणार आहेत. तसेच अंजली चष्मावाला अहिल्यानगर यांच्याकडून कॉम्प्युटराईज नेत्र तपासणी करुन चष्म्याचा अचुक नंबर काढून दिला जाईल व १००-१५० रुपयांपर्यत चष्मा उपलब्ध करुन मिळणार आहे तसेच रुग्णांची रक्तातील साखर व रक्तदाब तपासणी करुन मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड केली जाणार आहे व मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड केलेल्या रुग्णांना शिबीराच्या ठिकाणापासून, मोफत प्रवास, राहण्याची, जेवण्याची तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर काळा गॉगल मोफत, तसेच बिनटाक्याची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करुन चांगल्या प्रतीचे लेन्स वापरले जाणार आहेत. तसेच काचबिंदु, लासुर, डोळ्यावरील पडदा या शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. गरजू नागरिकांनी व नेत्र रुग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा.

नाव नोंदणीसाठी मोबा. नं. ९३२५१०८०५७ या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. चेमटे श्रीकांत यांनी केले आहे.

पुरूष सगळीकडेच दीन आहे

महिलांचे संरक्षण कायदे ढाल कि तलवार

नमस्कार मित्रांनो, १९ नोव्हेंबर हा जागतिक पुरुष हक्क दिन आहे. त्या निमित्त सदरचे विवेचन करावे वाटते. सर्व सामान्य जनतेला पूर्वीचे जुने कायदेच अजुन माहीत आहेत म्हणूनच त्याच कायद्याचा उल्लेख सदर लेखामध्ये केलाय...

आपला भारत देश पुरुष प्रधान असला तरीही भारताला आपण भारतमाता म्हणतो. जगा मध्ये असा एकच देश आहे ज्याला गर्वाने भारतमाता म्हणून संबोधलं जाते. राजमाता जिजाऊ मॉ साहेब, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, रणरागिणी झाशीची राणी लक्ष्मीबाई, पहिल्या महिला शिक्षिका आदरणीय सावित्रीबाई फुले, चॉद बिबी, मदर तेरेसा, माता रमाबाई अंबेडकर, फातिमा बीबी या आणि अशा कितीतरी महान महिलांचा आदर्श आजही मोठ्या भक्तिभावाने जपला जातोय. खरं तर महिला भगिनींनी या महान महिलांचा आदर्श ठेवलाच पाहिजे. आपला भारत देश हा लोकशाही माननारा देश आहे. त्यामुळे घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधान आणि लोकसभा व राज्यसभेतील कायदे मंडळाच्या वतीने जे कायदे आहेत त्याचे पालन करणे ही सर्व भारतीय जनतेची जबाबदारी आहे. देश स्वतंत्र झाल्यावर महिलांना संरक्षण मिळावे म्हणून अनेक कायदे निर्माण केले आणि महिलांना संरक्षण कवच दिले.

शहाबानो केस प्रकरणा पासुन जर एखाद्या महिलेला तिचा पती नांदवत नसेल तर तीला क्रिमीनल प्रोसीजर चे कलम १२५ प्रमाणे नव-या कडून खावटी किंवा पोटगी मागण्याचा अधिकार कायद्याने दिलेला आहे. तसेच एखाद्या महिलेच्या सासर कडील मंडळी तिचा विनाकारण छळ करीत असतील व पैशाची मागणी करत असतील तर ती महिला भा.द.वि. कलम ४९८ प्रमाणे तिच्या सासरच्या मंडळी विरूध्द गुन्हा दाखल करू शकते. तसेच आता सरकारने महिलांना अजुन जास्त संरक्षण मिळावे म्हणून डोमॅस्टीक व्हायोलेशन ॲक्ट २००५ हा कायदा पारित केला आहे. हा सगळा उहापोह करण्याचा उद्देश एकच आहे की, आपल्या देशात महिलांना कडे अजुनही अबला नारी म्हणूनच पाहिले जाते. वास्तविक पाहता आज महिला पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसत आहे. शासकीय, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात महिलांनी आपला ठसा उमठवला आहे. भारतात पंतप्रधान पदापासुन राष्ट्रपती पदापर्यंत महिला त्यांचे कर्तृत्वाने पुढे आलेल्या आहेत. तरीही आपण अजुन सुद्धा महिलांना अबला म्हणून संबोधतो. वास्तविक आता महिला अबला नसुन सबला झालेल्या आहेत. एक गोष्ट मात्र निश्चितच आहे की काही ठिकाणी महिला भगिनींना चांगली वागणूक दिली जात नाही व त्यांचेवर काही नराधम अत्याचार करतच आहेत. मुलगी अगदी स्वतः च्याच घरात सुद्धा सुरक्षित नाही याची अनेक उदाहरणे घडलेली आहेत. सगळ्यात घाणेरडी गोष्ट म्हणजे जवळच्या नातेवाईकां कडूनच अनेक ठिकाणी महिलावर अत्याचार झाल्याच्या घटना घडल्या आहेत. महिला भगिनींना सुरक्षितता मिळावी म्हणून त्यामुळे सरकारने महिलांना संरक्षण मिळावे म्हणून अनेक कायद्याची ढाल दिली आहे. त्यामुळे शासनाचे आभारच मानले पाहिजेत. कारण कोणालाही वाटते की, आपल्या घरातील महिला भगिनीं सुरक्षित राहिली पाहिजे, आणि त्यात वावगे काहीच नाही. परंतु जसजसे महिला सुशिक्षित झाली आणि घराबाहेर पडू लागली, नोकरी, व्यवसाय करू लागली आणि स्वकमाई ची रक्कम तिच्या हातात येऊ लागली तेव्हा तिच्या मनात सुद्धा इगो प्रोब्लेम निर्माण झाला. मग तिच्या सुद्धा स्वतंत्र स्वतःच्या मनाप्रमाणे जगण्यासाठी इच्छा पल्लवीत झाल्या. अर्थात महिलांनी स्वतःच्या इच्छे प्रमाणे जीवन जगण्यात वावगे काहीच नाही. पण काही काही महिला लग्नाच्या नंतर घरातील सासुसासरे यांना डस्टबीन समजायला लागल्या व लगेच पतीला घेऊन वेगळे रहायला लागल्या. त्यामुळे घराचे घरपण नाहीसे झाले. मग संसारात भांडण तंटा व्हायला लागले आणि प्रकरणे घराचे उंबरठे ओलांडून कोर्टात आणि पोलिस स्टेशनला जायला लागली. लग्नाच्या नंतर चार पाच महिने सुद्धा संसार कसाबसा होऊ लागल्याने अनेक जण घटस्फोट घेण्यापर्यन्त गेले. या सगळ्या गोष्टी पहाता एक गोष्ट निश्चितच लक्षात येते की, ॲडजस्टमेंट करायला कुणीच तयार नाही. मग काही काही महिलांनी विनाकारण सासुसासरे आणि नवरा यांना कायद्याचा धाक दाखवून वेगवेगळ्या स्वरूपात गुन्हे दाखल करायला सुरुवात केली. वास्तविक पहाता घर दोघांचं असतं, दोघांनी सावरायचं असतं, एकानी पसरविलं तर दुस-यांनी आवारायचं असतं ही संकल्पनाच राहिली नाही. त्यातच महिलां साठी सामाजिक काम करणा-या काही चांगल्या संघटना व्यवस्थित मार्गदर्शन करतात आणि तुटणारा संसार जोडण्याचा प्रयत्न करतात ही खरोखरच आनंदाची गोष्ट आहे. परंतु काही काही संघटना विनाकारण महिला भगिनींना भडकविण्याचे काम करतात आणि सासर कडील मंडळी विरूध्द वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हे दाखल करण्यास प्रवृत्त करतात. आता तर डी.व्ही. ॲक्ट २००५ चा सर्रासपणे दुरूपयोग होताना दिसत आहे. सध्या महिला पोटगी साठी कलम १२५ ची केस, भा. द.वि. कलम ४९८, डि. व्ही. ॲक्ट २००५ आणि तसेच हिंदू विवाह कायद्या नुसार केसेस चे पुर्णपणे पॅकेजच न्यायालयात दाखल करतात. वर्षानुवर्षे कोर्टात चकरा मारतात आणि नंतर कधी तरी आपसात तडजोड करतात. खरं तर पती पत्नीच्या भांडणात बिचा-या लहान मुलांचे खुपच हाल होतात. वास्तविक पहाता आपण या कायद्याचा कायदेशीरपणे थोडा जरी विचार केला तरी या मध्ये कुठेही फाशीच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली नाही. फक्त केवळ आणि केवळ पुरूषांना अर्थिक आणि शारीरिक व मानसिक त्रास देणे एवढाच उद्देश यात स्पष्ट पणे दिसुन येतो. तसेच एखाद्याची बायको व्यभिचार करत असेल, स्वतंत्र कमाई असेल, स्वतः होउन नांदत नसेल व नव-याचे घर सोडून गेली असेल तर तीला पोटगी मागण्याचा अधिकार नाही अशा स्वरूपाचे अनेक न्याय निर्णय उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यांनी दिलेले आहेत. तसेच एखाद्याची बायको वेळोवेळी पतीला व सासुसासरे यांना अपमानास्पद वागणूक देत असेल तर पतीला घटस्फोट मागण्याचा अधिकार सुद्धा आहे. तसेच एखाद्याची बायको नोकरी करत असेल आणि नवरा काहीच काम धंदा करत नसेल किंवा अपंग असेल तर तो बायको कडून पोटगी सुद्धा मागु शकतो. तसेच बायकोने शारिरीक आणि मानसिक छळ केल्या बद्दल नवरा सुद्धा पोलिस स्टेशनला तक्रार अर्ज दाखल करू शकतो. असे असले तरी पोलिस प्रशासन सुद्धा महिलांनी पुरूषांचे विरूध्द तक्रार दिली की लगेच नोंदणी करून घेतात पण एखादा पती आपल्या पत्नीच्या विरोधात तक्रार करायला पोलिस स्टेशनला गेला तर पोलिस त्याची तक्रार नोंदवून घेत नाहीत हे दुर्दैव आहे. आता तर महिलांनी व्यभिचार केला तरी गुन्हा दाखल केला जात नाही. तसेच तिच्या पहिल्या पती पासुन झालेल्या अपत्याची जबाबदारी दुस-या पतीवर येते अशा कायदेविषयक तरतुदी आहेत. एकंदरीत पुरूष हा सगळीकडेच दीन होत चाललाय. महिलांचे कौतुक करण्या साठी ८ मार्च हा महिलादिन म्हणून साजरा केला जात आहे. त्याचे स्वागत आहेच, पण कौतुक करण्या सारखे पुरूष या भारतात जन्मलेच नाहित का? मग पुरुष हक्क दिन का साजरा करत नाहीत. खरंतर सर्व पुरूषांनी यावर आवाज उठवून सरकारला जाग आणली पाहिजे.

जर कायदा सगळ्यानां समान असेल तर पोलिस प्रशासन यांनी महिला व पुरुष असा दुजाभाव का करावा हाच प्रश्न निर्माण झाला आहे. भरोसा सेल मधे सुध्दा पुरुषांवर अन्याय होत आहे. तिथे पण त्याची तक्रार घेतली जात नाहीत. पुरूषांवर झालेल्या अन्यायावरुन अद्याप एकाही महिले विरूध्द तक्रार दाखल झाल्याचे वाचनात येत नाही. आत्ता पर्यंत महिलांनी सासुसासरे आणि नवरा यांचे विरूध्द दाखल केलेल्या गुन्ह्यात शिक्षा झाल्याचे प्रमाण सुद्धा फारच कमी आहे. याचाच अर्थ असा की काही महिला विनाकारण सासुसासरे आणि नवरा यांना त्रास देण्यासाठी तक्रारी दाखल करतात आणि कायद्याचा वापर तलवार म्हणून करतात. काही ठिकाणी तर पुरूष वर्गाला ब्लॅकमेल करण्याचे प्रकार सुद्धा घडत आहेत. सिनेमा सृष्टीत असे अनेक अपप्रकार घडतात आणि त्यामुळे काही नटांना आत्महत्या करायची वेळ आली. तसेच आदरणीय भैय्यू महाराज देशमुख यांचे बरोबर सुद्धा ब्लॅकमेल चा प्रकार घडलाच होता. कधी कधी प्रेम प्रकरणातून अशा घटना घडतच असतात. कधी कधी महिला कडून पुरूषा विरुद्ध लग्नाचे अमिष दाखवून लैंगिक शोषण केले अशाही तक्रारी दाखल करण्यात येतात. पण या तक्रारी मध्ये सुद्धा ब-याच वेळा ब्लॅकमेल करण्याचा हेतू असतो हे सुद्धा नाकारता येणार नाही. जर खरोखरच जबरदस्तीने हे प्रकार घडत असतील अशा नराधमांना कठोर शिक्षा दिली पाहिजे असे वाटते आहे. परंतु हे जरी सत्य असले तरीही जवळपास ४५% महिला भगिनींना सासरच्या मंडळी कडून विनाकारण त्रास होत आहे हे सत्य सुद्धा नाकारता येणार नाही. अनेक ठिकाणी काही लालची मंडळी महिलांना जाणुन बुजुन त्रास देतात हे सुध्दा नाकारता येणार नाही. त्या नालायक माणसांना शिक्षा झालीच पाहिजेत अशी भूमिका पुरूष हक्क संरक्षण समितीची आहेच. अनेक पुरूषांनी पत्नी व तिच्या माहेर कडील मंडळी च्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याची उदाहरणे आहेत. महिला खोटे रडून रडून आपली कहाणी सांगतात त्यामुळे महिलांचे सांगण्यावर लगेच विश्वास ठेवला जातो, पण पुरूषांना रडता येत नाही त्यामुळे त्यांचेवर समाज विश्वास ठेवायला तयार नाही. सध्याची वाईट परिस्थिती पहाता लग्न पाच पंचवीस वर्षे टिकेल अशी परिस्थिती राहिली नाही. या पुढे पुरूषांनी सुद्धा सावध रहायला शिकलं पाहिजे. काही मुलींना फक्त नवराच पाहिजे असतो, त्याचे इतर नातेवाईक नको असतात. म्हणून सर्व कुटुंब व्यवस्थाच बिघडते की काय अशी भीती वाटायला लागली आहे. खरोखरच जर महिला भगिनींना त्रास असेल तर त्यांनी बिनधास्तपणे कायदेशीर कारवाई करायला हरकत नाही पण किरकोळ कारणावरून संसार उधळून लावणे योग्य नाही. म्हणून महिला भगिनींनी संरक्षणासाठी असलेल्या कायद्याचा वापर स्वतःच्या संरक्षणासाठी ढाल म्हणून करावा पण इतरांना मारण्यासाठी तलवार म्हणून करू नये हि विनंती.

आज पुरूषांवर होणारे अन्याय, अत्याचार याचे कडे सरकारचे दुर्लक्ष होत आहे. जसा महिलांवर अत्याचार झाले तर त्या महिला आयोगाकडे तक्रार करतात पण पुरूषांवर अन्याय झाल्यास त्याने कुणाकडे तक्रार करायची हा अनुत्तरित प्रश्न निर्माण होत आहे. त्या साठी पुरूष आयोग व्हायला पाहिजेत. पुरूषांची बाजु खंबीरपणे उचलून घेऊनच नाशिक येथे १९९६ मधे पुरूष आणि महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणारी पुरूष हक्क संरक्षण समितीची स्थापना करण्यात आली. त्या साठी ॲड. धर्मेंद्र चव्हाण, ॲड. बाळासाहेब आकडे, ॲड. बाळासाहेब पाटील, डॉ. सुनिल घाडगे आणि त्यांचे सहकारी कार्यरत आहेत. २९ नोव्हेंबर रोजी परभणी येथे २९ वे राष्ट्रीय अधिवेशन होत आहे. त्याचे आयोजन डॉ. सुनिल जाधव आणि त्यांचे सहकारी करत आहेत. जागतिक पुरुष हक्क संरक्षण दिनानिमित्त सर्व पुरूषांना न्याय मिळो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

लेखक – **ॲड.शिवाजी अण्णा कराळे,**
जिल्हाध्यक्ष- पुरुष हक्क संरक्षण समिती शाखा
अहिल्यानगर. मो.९९ २२ ५४५ ५४५

सौरभ बोरा यांना मिळालेला 'समाज रत्न' पुरस्कार अभिमानास्पद

किरण राका यांचे प्रतिपादन

नगर – आनंद तीर्थ समवशरण येथे महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा. यांच्या सान्निध्यात तिरुमला तिरुपती देवस्थानचे विश्वस्त उद्योजक सौरभ प्रमिलाताई हेमराज बोरा यांना 'समाज रत्न' पुरस्काराने गौरविण्यात आले. याप्रसंगी आमदार संग्राम जगताप, हभप संग्राम भंडारे उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल सौरभभाऊ बोरा मित्र परिवाराच्या (चातुर्मास भोजन कमिटी) वतीने बोरा यांचा सन्मान चिन्ह देवून सत्कार करण्यात आला. यावेळी संतोष पिपाडा, किरण राका, सुधीर मुनोत, संजय ताथेड, नितीन चंगेडिया, महेश गुगळे, राहुल गांधी, अमरदीप बोरा, सचिन डुंगरवाल, अजित शिंगवी, अमित चंगेडिया, पंकज मुनोत, निखिल गुगळे, चिराग गुगळे, धीरज कोठारी, मनोज पितळे, सचिन डागा, धनेश गांधी आदी उपस्थित होते.

किरण राका म्हणाले की, नगरमध्ये उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी महाराज यांचा चातुर्मास जाहीर झाल्यापासून उत्साहाचे वातावरण तयार झाले. या समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी म्हणून सौरभ बोरा यांनी जबाबदारी स्विकारली. त्यावेळी त्यांनी मित्र परिवाराला एकत्र करून हे शिवधनुष्य यशस्वीपणे पेलण्यासाठी प्रोत्साहन दिले. चारही महिने भाविकांच्या प्रसादाची चोख व्यवस्था राहील यासाठी त्यांनी भोजन कमिटी तयार करून सर्व नियोजन केले. त्यांच्या पाठबळाने मित्र परिवार अगदी घरचे कार्य असल्याप्रमाणे आपापल्या परिवारांसह ही व्यवस्था पाहत आहे. दानशूर व्यक्तीमत्व असलेल्या सौरभ बोरा यांना मिळालेला समाज रत्न पुरस्कार आमच्या सर्वांसाठी अभिमानास्पद आहे.



आनंद तीर्थ समवशरण येथे महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा. यांच्या सान्निध्यात तिरुमला तिरुपती देवस्थानचे विश्वस्त उद्योजक सौरभ प्रमिलाताई हेमराज बोरा यांना 'समाज रत्न' पुरस्काराने गौरविण्यात आले.

मित्र परिवारातर्फे सन्मान चिन्ह देऊन सत्कार

सत्काराला उत्तर देताना सौरभ बोरा म्हणाले, नगरमधील या ऐतिहासिक समर्पण चातुर्मासाची जबाबदारी स्विकारताना सर्व मित्र परिवाराची लखमोलाची साथ लाभली. चार महिने अहोरात्र सर्व मित्र परिश्रम घेत आहेत. निस्वार्थीपणे ते अविरत सेवा देत आहेत. भाविकांसाठी नवकारशी, दुपारचे भोजन, ब्याळू अशा सर्व व्यवस्था अतिशय सुंदर पद्धतीने पार पाडल्या. आदरातिथ्य करताना प्रत्येकाच्या मनात सेवाभाव होता. सामाजिक बांधिलकी म्हणून विविध सामाजिक संस्थांना देखील भोजन दिले. सर्व तपस्वीची देखील उत्तम व्यवस्था केली. सर्व मित्र परिवाराच्या सहकार्यामुळेच एक मोठी जबाबदारी पार पाडू शकलो याचा आनंद आहे.



महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, भिंगारच्या चेअरमनपदी डॉ. अशोक चंगेडे तर व्हा.चेअरमनपदी नितीन शिंगवी यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करुन अभिनंदन करण्यात आले.

महेश नागरी पतसंस्थेच्या चेअरमनपदी डॉ. अशोक चंगेडे तर व्हा.चेअरमनपदी नितीन शिंगवी यांची निवड झाल्याबद्दल सत्कार

नगर – भिंगार मधील महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी डॉ. अशोक शांतीलाल चंगेडे यांची फेरनिवड करण्यात आली तर व्हा. चेअरमनपदासाठी तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, अहिल्यानगर तर्फे अध्याशी अधिकारी म्हणून ए. ए. शेख, श्रेणी २ यांचे अध्यक्षतेखाली संचालक नितीन पोपटलाल शिंगवी व मारुती कुंडलिकराव पवार यांनी व्हा. चेअरमन पदासाठी भरलेले अर्जानुसार दोघांत गुप्त मतदान होऊन नितीन शिंगवी हे बहुमताने विजयी झाले. असे निवडणूक अधिकारी ए. ए. शेख व सहाय्यक निवडणूक अधिकारी श्री. बनसोडे यांनी जाहीर केले, तद्नंतर सभेमध्ये असलेले संचालक शांतीलाल मुनोत, संजयकुमार सपकाळ, प्रकाश चोरडिया, कांतीलाल बोरा, विनोद भंडारी, सुशील भंडारी, पवन गुंदेचा, संजय (सनी) मुनोत, सुदाम गांधले, किरण पतके, मारुती पवार, सौ. वैशाली बोरा, सौ. अंजली शिंगवी व संस्थेचे व्यवस्थापक राजेंद्र मेहेर व अधिकारी व कर्मचारी यांनी डॉ. अशोक चंगेडे व नितीन शिंगवी यांचा व निवडणूक अधिकारी ए. ए. शेख व श्री. बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला. चेअरमन व व्हा.चेअरमन यांचे अभिनंदन करण्यात आले.

स्नेहालयात २१ नोव्हेंबरला दिवाळी मेळाव्याचे आयोजन

लायन्स क्लब ऑफ अहिल्यानगरचा १९ वा दिवाळी मेळावा; गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानचे सहकार्य

नगर – लायन्स क्लब ऑफ अहिल्यानगरच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही वंचित व गरजू मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यासाठी १९ व्या दिवाळी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता स्नेहालय येथे आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाला गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानचे विशेष सहकार्य लाभणार आहे. नागरिकांना या सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन अध्यक्ष हरजितसिंग वधवा, सचिव हरीश हरवानी, खजिनदार विजय कुलकर्णी आणि लिओ अध्यक्ष हर्ष किथानी यांनी केले आहे.

या मेळाव्यामध्ये मुलांसाठी विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. फन फेअर, बुद्धी के बाल, मिनी ट्रेन, फुगे, जंपिंग, विविध खेळ, मेहंदी, रांगोळी तसेच आकर्षक ऑर्केस्ट्रा आणि डीजे यांचा आनंद मुलांना घेता येणार आहे. लिओ क्लबच्या सदस्यांकडून विशेष खेळांचे आयोजन करण्यात येणार आहे. कार्यक्रमानंतर सर्वांसाठी अल्पोपहार व स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

या उपक्रमाचे प्रकल्प अध्यक्ष म्हणून दिलीप कुलकर्णी, प्रिया मुनोत, डॉ. अमित बडवे आणि गुरनूरसिंग वधवा जबाबदारी सांभाळत आहेत. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एस. एस. दीपक, मोहनलाल मानधना, सिमरतलाल बोरा आणि शरद मुनोत उपस्थित राहणार आहेत.

या मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी सुनील छाजेड, किरण भंडारी, कमलेश भंडारी, प्रशांत मुनोत, धनंजय भंडारे, अरविंद पारगावकर, डॉ. संजय असनानी, संतोष माणकेश्वर, योगेश भंडारी, संदेश कटारिया, सीए शंकर अंदानी, सुमित लोढा, तसेच लिओ ओम भंडारी आणि जपज्योत बग्गा प्रयत्नशील आहेत.

हा उपक्रम म्हणजे सामाजिक बांधिलकी, माणुसकी आणि आनंद वाटण्याच्या भावनेचा सुंदर उत्सव ठरत आहे. वंचित व गरजू मुलांना दिवाळीचा आनंद अनुभवता यावा, त्यांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण निर्माण व्हावेत, या उद्देशाने आयोजित करण्यात येणाऱ्या या मेळाव्याला अधिकाधिक नागरिकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

शहराच्या लष्करी परंपरेला अभिमानाचे प्रतीक देण्यासाठी अहिल्यानगरच्या मुख्य चौकात लष्करी रणगाडा साकारावा

महापालिका व लोकप्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा : माजी नगरसेवक जयंत येलुलकर यांची मागणी

नगर – अहिल्यानगर शहराला भारतीय लष्कराच्या पायदळाची गौरवशाली परंपरा लाभली आहे. भारतीय लष्कराच्या पायदळाचे महत्त्वपूर्ण केंद्र, लष्करी प्रशिक्षणाची परंपरा, तसेच रणगाड्यांशी संबंधित महत्त्वाचे वर्कशॉप यामुळे आपल्या शहराचे भारतीय संरक्षण दलाशी एक अतूट नाते जोडले गेले आहे. या लष्करी वारशाचे अर्थात रणगाड्याचे दर्शन शहरातील योग्य चौकात घडावे आणि शहराच्या अस्मितेचे एक अभिमानास्पद प्रतीक उभे राहावे, अशी मागणी रसिक ग्रुपचे अध्यक्ष माजी नगरसेवक जयंत येलुलकर यांनी केली आहे.

खरे तर अहिल्यानगरचा लष्करी वारसा केवळ इतिहासापुरता मर्यादित नाही. येथे लष्करी परिसरात आशियातील पहिले 'वॅव्हलरी टँक म्युझियम' साकारण्यात आले आहे. १९९४ मध्ये सुरू झालेल्या या वैशिष्ट्यपूर्ण संग्रहालयात दुसऱ्या महायुद्धात वापरले गेलेले तसेच विविध देशांतील ऐतिहासिक रणगाडे आणि चिलखती लष्करी वाहने जतन करण्यात आली आहेत. या संग्रहालयात सुमारे ५० ऐतिहासिक रणगाडे व लष्करी वाहने पाहायला मिळतात. लष्करी इतिहासाची आवड असणारे नागरिक, अभ्यासक आणि पर्यटक हे संग्रहालय पाहण्यासाठी खास अहिल्यानगरला भेट देतात.

अशा वैशिष्ट्यपूर्ण लष्करी वारशाचा अभिमान आपल्या शहराला असताना, त्याचे एक ठळक प्रतीक शहराच्या प्रमुख चौकात किंवा शहरातून जाणाऱ्या महामार्गालगत असावे, असे मनापासून वाटते. भारतीय लष्कराच्या सेवेतून निवृत्त झालेला एखादा रणगाडा अधिकृत परवानगीने उपलब्ध करून घेऊन त्याचे आकर्षक सुशोभीकरण करण्यात यावे. त्यासोबत लष्करी इतिहासाची माहिती देणारा फलक आणि लष्करी अधिकाऱ्यांचे स्मृतिशिल्प उभारण्याचाही विचार करता येईल.



यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेने पुढाकार घ्यावा. महापौर, लोकप्रतिनिधी तसेच संबंधित प्रशासनाने भारतीय लष्कराच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी अधिकृत पत्रव्यवहार करून याबाबत मागणी करावी. योग्य जागेची निवड, लष्कराची परवानगी आणि आवश्यक तांत्रिक बाबींची पूर्तता करून ही संकल्पना प्रत्यक्षात आणता येऊ शकते.

अशा प्रकारचे रणगाड्याचे सुशोभीकरण शहराला एक वेगळी ओळख देईल. लहान मुलांपासून तरुणांपर्यंत प्रत्येकाला भारतीय सैन्यदलाविषयी कुतूहल आणि अभिमान वाटेल. शहरात येणाऱ्या पर्यटकांसाठीही हे एक आकर्षण ठरेल. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे देशाच्या संरक्षणासाठी योगदान देणाऱ्या सैनिकांच्या शौर्याची आणि त्यागाची आठवण पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचे ते एक प्रभावी माध्यम ठरेल.

शहराचा विकास म्हणजे केवळ रस्ते, उड्डाणपूल, उद्याने किंवा इमारतींची निर्मिती नव्हे; तर शहराची स्वतंत्र ओळख, इतिहास, संस्कृती आणि अभिमान जपणारी प्रतीके उभी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

अहिल्यानगरला लष्करी परंपरेचा जो अनमोल वारसा लाभला आहे, यामुळे त्याचे एक भव्य आणि कायमस्वरूपी प्रतीक शहरात उभे राहावे, असेही येलुलकर यांनी म्हटले आहे.



तो इंजिन ऑईल पिऊन जगतो

जगात अनेक तऱ्हेची माणसं असतात. काही साधी-भोळी, काही खट्याळ तर काही अतरंगी. सोशल मीडियावरही अशा काही माणसांचे किस्से, फोटो, व्हिडीओ फिरत असतात. अलिकडेच कर्नाटकातून एक विचित्र प्रकरण समोर आले आहे. तिथे एका माणसाने आपल्या खाण्याच्या सवयींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. असा दावा केला जात आहे की, हा माणूस पोळी-भाजी, भात-आमटी असे सामान्य अन्न खात नाही तर तो इंजिन ऑइलवरच जगतो. 'इंजिन ऑइलवर जगणारा माणूस' अशीच त्याची ख्याती आहे. इंस्टाग्रामवर एक रील समोर आल्यावर त्या माणसाची गेल्या अनेक दशकांपासूनची ही जुनी सवय व्हायरल झाली आहे. विशेष म्हणजे, गेल्या तीस वर्षांपासून त्याच्या आहारात इंजिन ऑइलचा समावेश आहे. सोशल मीडिया पोस्टनुसार, कर्नाटकातील शिवमोगा जिल्ह्यातील रहिवासी असणारा हा माणूस आजूबाजूच्या परिसरात 'ऑइल कुमार' म्हणून ओळखला जातो. तो दररोज अंदाजे सात ते आठ लिटर इंजिन ऑइल पित असल्याचे सांगितले जाते. एवढंच नव्हे तर तो नियमितपणे चहाही पितो.

या पोस्टनुसार, अनेक दशके इंजिन ऑइल प्यायल्यानंतरही ऑइल कुमार यांना कधीही रुग्णालयात दाखल करावे लागले नाही किंवा त्यांना कधीही कोणत्याही आरोग्य समस्यांचा सामना करावा लागलेला नाही. असे जीवन भगवान अय्यप्पांच्या आशीर्वादामुळे मिळाल्याचा ऑइल कुमारांना विश्वास आहे. दैवी मदतीखेरीज अशा असामान्य आहारावर कोणीही जगणे शक्य नसल्याचा दावा ते करतात.

कॅलिडोस्कोप

व्हिसाशिवाय फिरा ५८ देश



भारतीय पासपोर्ट असेल तर तुम्ही ५८ देशांमध्ये व्हिसाशिवाय प्रवास करु शकता. या देशांची यादी कमी लोकांना माहिती आहे. फक्त थायलंड आणि मलेशियासारख्या देशांमध्ये व्हिसामुक्त किंवा व्हिसा-ऑन-अरायव्हलसह भेट दिली जाऊ शकते, असे काहींना वाटते. मात्र हेन्ले पासपोर्ट इंडेक्स २०२५ नुसार, भारतीय नागरिक व्हिसाशिवाय ५८ देशांमध्ये प्रवास करू शकतात.

या यादीतील लोकप्रिय ठिकाणांमध्ये इंडोनेशिया, मॉरिशस, केनिया, मालदीव आणि थायलंड या देशांचा समावेश आहे. हे देश सुंदर लँडस्केप आणि संस्कृतीसाठी ओळखले जातात. शिवाय लाओस, मादागास्कर, फिजी आणि झिम्बाब्वे यासारखे देश अनोखा अनुभव देतात. इंडोनेशिया आणि थायलंड उत्कृष्ट सफारी आणि निसर्गसौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे. फिजी आणि पलाऊ बेटे नैसर्गिक समुद्रकिनारे आणि विविध सागरी जीवनासाठी ओळखली जातात.

भूतान आणि नेपाळ हे अद्वितीय संस्कृती आणि परंपरा असणारे तसेच सहज पोहोचण्यायोग्य देश आहेत. ही वेगवेगळ्या खंडांवर स्थित देश आणि बेटांची यादी आहे. यापैकी काही लहान बेट देश आहेत तर काही आफ्रिका आणि आशियामध्ये आहेत. अंगोला, बुरुंडी, केनिया, मोझांबिक, नामिबिया, इथिओपिया, सोमालिया, टांझानिया, झिम्बाब्वे, सेशेल्स, मॉरिशस, मादागास्कर, सेनेगल, सिएरा लिओन, गिनी-बिसाऊ, जिबूती, केप वर्दे हे आफ्रिकेतील देश असून तिथे व्हिसाशिवाय जाता येते. आशियातील भूतान, नेपाळ, श्रीलंका, म्यानमार, थायलंड, मलेशिया, मालदीव, इंडोनेशिया, इराण, कझाकस्तान, कंबोडिया, लाओस, मकाऊ (चीनचा भाग), कतार, जॉर्डन, मंगोलिया, तिमोर-लेस्टे या देशांतही व्हिसाशिवाय जाता येते. कॅरिबियन समुद्रातील बार्बाडोस, डोमिनिका, ग्रेनाडा, हैती, जमैका, सेंट किट्स आणि नेव्हिस, सेंट लुसिया, सेंट व्हिन्सेंट आणि ग्रेनेडाइन्स, त्रिनिदाद आणि टोबॅगो, मोंटसेराट (यूकेचा भाग), ब्रिटिश व्हर्जिन बेटावरही व्हिसाशिवाय जाता येते. पॅसिफिक महासागरातील (ओशनिया) लहान बेट देश म्हणजे फिजी, सामोआ, वानुआतु, तुवालू, किरिबाटी, मार्शल बेटे, मायक्रोनेशिया, पलाऊ, कुक बेटे, नियू, कोमोरोस बेटे तसेच भारताभोवती अनेक देश भारतीय नागरिकांना व्हिसा-मुक्त प्रवेश किंवा सोप्या प्रवेश प्रक्रिया देतात. त्यामुळे प्रवास करणे सोपे होते. नेपाळची भारताशी खुली सीमा आहे. त्यामुळे व्हिसा किंवा इतर कोणत्याही गुंतागुंतीच्या प्रक्रियेशिवाय थेट भेट देता येते. भूतानला व्हिसाची आवश्यकता नाही. फक्त प्रवेश परवाना आवश्यक आहे. तो सहज मिळू शकतो. श्रीलंका भारतीय नागरिकांना आगमनानंतर व्हिसा देते. काही देशात प्रवास करण्यापूर्वी 'इलेक्ट्रॉनिक ट्रॅव्हल ऑथोरायझेशन' (ईटीए) मिळवण्याची आवश्यकता असू शकते. आगमनानंतर व्हिसा आवश्यक असू शकतो. त्यासाठी पासपोर्ट परतीच्या तारखेपासून किमान सहा महिने वैध असणे आवश्यक आहे. व्हिसाशिवाय एखाद्या देशात प्रवास करत असाल, तर तेथे जास्तीत जास्त किती दिवस राहण्याची परवानगी आहे, हे मात्र तपासले पाहिजे.

मोबाईल सोपवले भामट्याकडे!

लोकांना फसवण्याचे प्रकार सगळीकडे सर्रास सुरूच असतात आणि त्यासाठीचे अफलातून प्रकारही भामटे शोधून काढत असतात. पाकिस्तानातील एका भामट्याने असलाच एक भन्नाट प्रकार शोधून काढला आणि तब्बल साठ उच्चशिक्षित तरुणींचे महागडे मोबाइल त्यांच्यासमक्ष घेऊन तो पसार झाला! एकाच दिवशी, एकाच वेळी आणि प्रत्यक्ष त्या तरुणींनीच स्वत:हून आपापले मोबाइल या भामट्याच्या हाती सोपवल्याने यावरून हसावे की रडावे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

एका तरुणाने 'सोशल मीडिया' आणि व्हॉट्सपच्या माध्यमातून उच्चशिक्षित तरुणींना थोड्याशा काम ासाठी उत्तम पैशांचे आमिष दाखवले. चांगले काम करणाऱ्या तरुणींना अधिक पगार आणि परमनंटही करण्यात येईल, असाही दावा करण्यात आला होता. एका कार्यक्रमात स्टॉल सांभाळण्याचे आणि आठवडाभर काम केल्यास दररोज दोन हजार



पाकिस्तानी रुपये तसेच इतर सुविधा देण्याचे आश्वासन त्याने या तरुणींना दिले. या सर्व तरुणींना कराची शहराबाहेरील एका फार्महाऊसवर नेण्यात आले. प्रत्यक्ष कार्यक्रमाचे ठिकाण कराचीबाहेरील एका गेटेड कम्युनिटीत असल्याचे त्यांना सांगण्यात आले होते. अनोळखी ठिकाणी पोहोचल्यामुळे काही तरुणी घाबरल्या; मात्र मुख्य आरोपी अतिशय सामान्यपणे वागत होता. फार्महाऊसवर महिला समन्वयकाशी भेट होईल आणि दुपारचे जेवण झाल्यानंतर सर्वांना बहरिया टाउनमध्ये नेऊन स्टॉल लावण्याचे काम दिले जाईल, असे त्याने सांगितले. यानंतर कंपनीच्या धोरणाचा हवाला देत सर्व तरुणींचे मोबाइल त्याने जमा करून घेतले.

कामाच्या ठिकाणी मोबाइल वापरण्यास परवानगी नसल्यामुळे काम संपल्यानंतर मोबाइल परत केले जातील, असे आश्वासन त्यांना देण्यात आले. तरुणींनी आरोपीवर विश्वास ठेवून आपापले मोबाइल त्याच्याकडे दिले; मात्र काही वेळातच आरोपी त्यांच्यासमक्ष मोबाइलने भरलेली बॅग घेऊन मोटारसायकलवरून फरार झाला! स्थानिक पोलिस अधिकारी मुहम्मद अली यांनी सांगितले, की या सर्व तरुणी नोकरीच्या शोधात होत्या आणि त्यातील बहुतांश मध्यम वर्गीय कुटुंबांतील होत्या. चांगली कमाई आणि कायमस्वरूपी नोकरीची संधी, या आशेने त्या या कामासाठी तयार झाल्या होत्या.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, एकाचवेळी इतक्या मोठ्या संख्येने मोबाइल घेऊन फरार होण्याची घटना त्यांनी यापूर्वी पाहिलेली नाही. या प्रकरणातील मुख्य आरोपी अद्याप फरार आहे. या घटनेमुळे फसवणूक झालेल्या तरुणींना मोठा धक्का बसला आहे; पण त्याचवेळी आपण इतके सुशिक्षित असतानाही एका भामट्याने इतक्या सहज आपल्याला उल्लू बनवले याची त्यांना प्रचंड लाजही वाटते आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, फसवणूक झालेल्या तरुणींची आणि चोरीला गेलेल्या मोबाइलची संख्या बरीच जास्त असल्याची शक्यता आहे.



बायको परत मिळावी म्हणून...

आपल्याला सोडून गेलेली बायको परत मिळावी, म्हणून दीपक सूर्यवंशी या व्यक्तीने गाढविणीसोबत प्रतीकात्मक विवाह केला. या प्रकरणी पोलिसांनी सूर्यवंशी याला ताब्यात घेतले. सूर्यवंशी १५ दिवसांपासून पूनम गेटसमोर आंदोलनाला बसले होते. त्यांनी जिल्हा प्रशासन आणि पोलिस अधीक्षक कार्यालयाला निवेदन दिले होते. आपला १६ वर्षाचा संसार तुटला. या प्रकरणात पत्नीच्या नात्यातील दोन व्यक्तींचा समावेश आहे, असा त्याचा आरोप होता. प्रशासनाकडून या प्रकरणी कोणतीही दखल घेतली जात नसल्याने गाढविणीसोबत लग्न करणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार त्यांनी एक गाढवीण आणली. मंगलाष्टके आणि गाढविणीच्या गळ्यात पुष्पहार अर्पण करून त्यांनी हा प्रतीकात्मक विवाह केला. या वेळी त्यांच्यासोबत त्यांचे काही मित्र उपस्थित होते. सायंकाळी पाच वाजता पोलिसांनी सूर्यवंशी यांना थेट पोलिस ठाण्यात आणले. रात्री उशिरापर्यंत ते तिथेच थांबून होते. लग्न ही महाराष्ट्रातील गंभीर समस्या झाली आहे. अनेक तरुणांचे विवाह जुळत नाहीत. मुलांबद्दल मुलीकडचे लोक अनेक अपेक्षा ठेवून असतात. त्यामुळे लग्नाळू तरुण व्यसनाधीन झाले आहेत. आता मला माझा संसार करायचा आहे. त्यामुळे मी प्रतीकात्मक आंदोलन केले. जिल्हा परिषदेसमोर गाढव फिरत असतात. तिथूनच या गाढवांना ताब्यात घेतले होते. आता पोलिसांनी माझ्यावर जी कारवाई करायची आहे ती करावी.

डॉक्टरचा प्रेयसीवर गोळीबार

मध्य प्रदेशातील भोपालच्या गांधीनगर परिसरात धक्कादायक घटना समोर आली आहे. ब्रेकअपनंतर मानसिकदृष्ट्या अस्वस्थ झालेल्या डॉक्टर नवीनने त्याची डॉक्टर गर्लफ्रेंड श्वेता आणि तिच्या भावावर गोळीबार केल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून पोलिस संपूर्ण प्रकरणाचा तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, नवीन आणि श्वेता गेल्या सात वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये होते. दोघेही आरकेडीएफ मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी होते; मात्र काही काळापूर्वी दोघांचे नाते तुटले. ब्रेकअपनंतर नवीन भावनिकदृष्ट्या अस्वस्थ झाला होता. त्याने श्वेताशिवाय जगू शकत नसल्याचे मित्रांजवळ सांगितल्याचे वृत्त आहे. या प्रकरणातील सर्वाधिक चर्चेत आलेली बाब म्हणजे घटनेपूर्वी नवीनने मित्रांसोबत 'दृश्यम-३' चित्रपट पाहिला होता. चित्रपट पाहिल्यानंतर तो थेट श्वेताच्या फ्लॅटकडे गेला. त्यानंतर त्याने श्वेता आणि तिच्या भावावर गोळीबार केल्याचे वृत्त आहे. या घटनेमागील नेमका हेतू आणि चित्रपटाचा त्याच्या कृतीशी काही संबंध होता का, याचा तपास पोलिस करत आहेत. श्वेता आणि तिच्या भावावर गोळीबार केल्यानंतर नवीनने



स्वत:चाही जीव घेण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे प्रकरण अधिक गंभीर बनले आहे. पोलिसांकडून घटनेची पार्श्वभूमी, नवीनची मानसिक अवस्था, ब्रेकअपची कारणे आणि गोळीबारामागील परिस्थिती यांचा तपास केला जात आहे. या घटनेनंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे. सात वर्षांचे नाते तुटल्यानंतर निर्माण झालेला मानसिक ताण, नवीन आणि श्वेता यांच्यातील मतभेद तसेच घटनेपूर्वी घडलेल्या घटनांची माहिती तपासली जात आहे. या प्रकरणामुळे नातेसंबंधातील तणाव वाढल्यास भावनिक आधार आणि मानसिक आरोग्याच्या मदतीचे महत्त्वही अधोरेखित झाले आहे; मात्र घटनेमागील संपूर्ण कारणे आणि जबाबदारी तपास पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होतील.


... त्यांना नोकरी देऊ नका!

नोकरीची सर्वात जास्त गरज असलेल्या माणसाला नोकरीवर ठेवलं तर कंपनीला फायदा होतो, असं सर्वसामान्य लॉजिक आहे; पण एका मारवाडी 'बिझनेस वूमन'ने बिलकुल याउलट म्हटलं आहे. मारवडी बिझनेस वुमन महिमा जालान यांनी आपल्या 'सोशल मीडिया अकाऊंट'वर या मागचं कारण सांगितलं. 'ज्यांना नोकरीची सर्वात जास्त गरज आहे, अशा माणसांना नोकरी देऊ नका' असं त्या म्हणाल्या. मी एका पॉडकास्टमध्ये दीपिंदर गोयलला हे बोलताना ऐकलं होतं, त्या वेळी मला त्यांच्या म्हणण्याचा अर्थ समजला नव्हता; पण आता, शंभरपेक्षा जास्त इंटरव्यू घेतल्यानंतर मला लक्षात आलंय की यामागे काय कारण आहे असं महिमा जालान म्हणाल्या. काही लोक असे असतात, जे खूप हैराण असतात. कारण त्यांना बऱ्याच काळापासून नोकरी मिळालेली नसते. नोकरी मिळाल्यानंतर त्यांना असं वाटतं, की आपल्याला काहीतरी जास्त करून दाखवण्याची गरज आहे. कारण बराच काळ आपण काही कामाचे नाही, या विचारातून ते गेलेले असतात किंवा त्यांचा आत्मविश्वास कमी झालेला असतो. म्हणून स्वत:ला सिद्ध करण्याच्या नादात हे लोक बरेच तास काम करतात. बऱ्याच प्रकरणात हे लोक संपूर्ण टीमच्या 'प्राडक्टिविटी लेवल'चं नुकसान करतात असं महिमा म्हणाल्या. अर्ध्या रात्री जेव्हा ते ई-मेल पाठवतात, तेव्हा टीम मधल्या दुसऱ्या सदस्यांना असं वाटतं, की मी पण असं केलं पाहिजे का? व्यवस्थापनाला माझ्याकडून हीच अपेक्षा आहे का? पण त्यांच्या अशा कामांमुळे सहकाऱ्यांवर आपोआपच नको ते दबाव निर्माण होतो असं महिमा म्हणाल्या. शेवटी ते लोक भरपूर थकतात. त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो. आपल्या खराब 'वर्क-लाइफ बलॅन्स'साठी ते फाऊंडर किंवा कंपनीला दोषी ठरवतात.



श्रीमंतानी टाकलेल्या वस्तू विकून ती झाली श्रीमंत!

नकोशा असल्याने टाकलेल्या वस्तूंचे भंगार उचलून कोणी श्रीमंत बनू शकतो का ? ही गोष्ट आश्चर्यकारक असली तरी खरी आहे. एका महिलेने टाकाऊतून टिकाबू वस्तू तयार करत श्रीमंती गाठली आहे. या महिलेने लोकांनी टाकून दिलेले जुने सामान रिपेअर करून




वस्तू उचलून घरी आणतात आणि त्याला नवे रुप देतात. या वस्तू विकून त्या बक्कळ पैसे कमावत आहेत.

मॅगी यांना २०२० मध्ये आर्थिक तंगीचा सामना करावा लागला. त्या वेळी त्यांनी रस्त्याच्या कडेला टाकलेले जुने टेबल उचलून घरी आणले आणि आवश्यक ती दुरुस्ती, डागडुजी करुन आकर्षक कलर लावला. त्या म्हणतात की, महागड्या किंमतीत विकण्यास सुरुवात केली.

या अमेरिकन महिलेने अलिकडेच त्यांची कहाणी जगाला सांगितली. टेक्सासमध्ये राहणाऱ्या ३० वर्षीय मॅगी मॅकगॉ यांनी कधी विचार केला नसेल, की दुसऱ्याने टाकलेल्या वस्तूंमुळे त्यांचे भविष्य बदलेल. आज मॅगी टिकटॉक स्टार आहेत. टिकटॉकवर त्यांचे ११ लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत. त्यांना ४.५ कोटीहून अधिक लाईक्स मिळाले आहेत. मॅगी जुने फर्निचर तसेच रस्त्याच्या कडेला पडलेल्या त्याआधी हातात कधी पेंट ब्रशदेखील घेतला नव्हता न कोणते पॉवर टूल वापरले होते. त्या स्वत:ला कधीच क्रिएटीव्ह वगैरे मानत नव्हत्या. परंतु यानंतर त्यांचे आयुष्य बदलले. काही वेळा त्या दोन तासात श्रीमंत परिसरातून ६०० डॉलर (सुमारे ५०,००० रुपये) पर्यंतचे सामान एकत्र करतात.

रडणाऱ्या बाळासाठी हनुमानचालिसा!

बाळ रडायला लागल्यावर घरात आई बाबांची धावपळ सुरू होते. मग ते बाळ कोणत्या देशातलं का असेना, आई बाबांची धावपळ ठरलेली असते; पण अमेरिकेत राहणाऱ्या एका चीनी महिलेने अशी काही आयडिया केली आहे, ज्यामुळे तिच्या बाळाने कितीही चिडचिड केली तरी तो मंत्र ऐकून क्षणार्धात शांत होतं आणि झोपीही जातं. बाळ रडायला लागलं, की ही महिला थेट हनुमान चालिसा लावते. तिच्या म्हणण्यानुसार, हनुमान चालिसा सुरू केल्यानंतर तिचं बाळ अवघ्या पाच सेकंदात शांत होतं आणि दोन मिनिटांत झोपीही जातं. याबाबतची माहिती महिलेने स्वत: 'सोशल मीडिया'वर पोस्ट शेअर करत दिली आहे. या महिलेचं नाव सारा जेन हो असून ती चीनी वंशाची व्यावसायिक महिला आहे. ती अमेरिकेतील लॉस एंजेलिसमध्ये राहते. वयाच्या चाळिसाव्या वर्षी सरोगसीच्या माध्यमातून ती आई झाली. तिचं बाळ चार महिन्यांचं आहे. आई झाल्यानंतर सारा आपल्या बाळाच्या रोजच्या दिनचर्येबद्दल 'सोशल मीडिया'वर पोस्ट शेअर करत असते. त्यात तिने बाळ रडल्यावर त्याला शांत करण्यासाठी हनुमान चालिसा लावण्याचा अनुभवही शेअर केला. साराने तिच्या पोस्ट मध्ये सांगितलं, की हनुमान चालिसाबद्दल तिला तिच्या भारतीय मित्रांकडून माहिती मिळाली. अमेरिकेतली 'बर्निंग मॅन' या कार्यक्रम ादरम्यान तिची काही भारतीय मित्रांशी ओळख झाली होती. त्यांच्याकडून तिने हनुमान चालिसाचं महात्म्य ऐकलं. त्यानंतर तिने तिच्या बाळाला हनुमान चालिसा ऐकवला. बाळ चिडचिड करत असेल किंवा रडत असेल, तर ती आधी त्याला कडेवर घेते. ती काही वेळ बाळाला रडू देऊन स्वत:हून शांत होण्यासाठी काही ना काही करते.



लक्झम्बर्गला या, बिनधास्त फिरा

राजधानी दिल्लीत महिलांना बसमधून मोफत प्रवास करता येतो. यासोबतच काही राज्यांमध्ये महिलांना सवलतीत तिकिट दिलं जातं. महिलावर्गाला खूश करण्यासाठी राजकारणी अशा विविध सवलती आणि योजनांची घोषणा करतात. मात्र लक्झम्बर्ग या देशातली सार्वजनिक वाहतूक सर्वांसाठी मोफत करण्यात आली आहे. तुम्ही महिला असा वा पुरुष, सार्वजनिक वाहतूक सेवेचा वापर करण्यासाठी तुम्हाला एकही पैसा खर्च करावा लागणार नाही.

ट्रेन, ट्राम तसंच बसमधून प्रवाशांना मोफत फिरता येईल. लक्झम्बर्गचे नागरिकच नाहीत तर इथे येणाऱ्या पर्यटकांनाही या सुविधेचा लाभ घेता येणार आहे. म्हणजेच लक्झम्बर्गमध्ये येणारे पर्यटक सगळीकडे मोफत फिरू शकतील. लक्झम्बर्ग हा युरोप खंडातला सातव्या क्रमांकाचा सर्वात लहान पण श्रीमंत देश आहे. हा देश खूप सुंदर आहे. इथे पर्यटकांचा राबता असतो. एक मार्च २०२० पासून इथे प्रवाशांना मोफत फिरता येणार आहे. २०१८ च्या अखेरीस झेवियर बेटल यांनी लक्झम्बर्गच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. निवडणूक प्रचारादरम्यान त्यांच्या पक्षाने मोफत वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्याचं आश्वासन दिलं होतं. या आश्वासनानुसार सरकार मोफत प्रवास योजना लागू करणार आहे. सरकारच्या



या निर्णयाचा लाभ लक्झम्बर्गचे सहा लाख नागरिक, एक लाख ७५ हजार मजूर आणि वर्षभरात लक्झाम्बर्गला येणाऱ्या १२ लाख प्रवाशांना होणार आहे. सार्वजनिक वाहतूक सेवा मोफत उपलब्ध करून दिल्यामुळे गाड्यांची गर्दी कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. अधिकाधिक नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा लाभ घ्यावा, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिक वापर केल्यास प्रदूषणाचं प्रमाणही कमी होईल. लक्झाम्बर्गमध्ये गाड्यांची संख्या प्रचंड आहे. इथली जवळपास ६० टक्के जनता प्रवासासाठी वैयक्तिक गाड्यांचा वापर करते. मात्र ताज्या निर्णयामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या वापराला प्रोत्साहन मिळणार आहे.

शिक्षकांच्या प्रश्नांसाठी खा. नीलेश लंके यांचे जिल्हा परिषदेत ठिय्या आंदोलन

बदली, पदोन्नती व समायोजन प्रक्रियेतील कथित अनियमिततांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी

नगर – जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या बदली, पदोन्नती आणि अतिरिक्त शिक्षक समायोजन प्रक्रियेत झालेल्या कथित अनियमितता, नियमबाह्य निर्णय आणि प्रशासकीय मनमानीची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, या मागणीसाठी खासदार नीलेश लंके यांनी आक्रमक भूमिका घेत १८ नोव्हेंबर रोजी जिल्हा परिषदेत ठिय्या आंदोलन सुरू केले.



जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या बदली, पदोन्नती आणि अतिरिक्त शिक्षक समायोजन प्रक्रियेत झालेल्या कथित अनियमितता, नियमबाह्य निर्णय आणि प्रशासकीय मनमानीची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, या मागणीसाठी खासदार नीलेश लंके यांनी आक्रमक भूमिका घेत १८ नोव्हेंबर रोजी जिल्हा परिषदेत ठिय्या आंदोलन सुरू केले.

यासंदर्भात राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांना निवेदन देण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षकांच्या बदली प्रक्रियेत शासनाने निश्चित केलेल्या निकषांचे पालन होत नसल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. पात्र शिक्षकांना डावलणे, प्राधान्यक्रमानुसार बदल्या न होणे, रिक्त पदांच्या उपलब्धतेबाबत विसंगती आणि ऑनलाइन बदली प्रक्रियेतील पारदर्शकतेचा अभाव अशा बाबी निदर्शनास आल्या आहेत. शिक्षकांच्या सेवाविषयक हक्कांशी आणि कौटुंबिक परिस्थितीशी संबंधित हा संवेदनशील विषय असल्याने संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व नियमबद्ध असणे आवश्यक आहे.

शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या पदोन्नती प्रक्रियेतील ज्येष्ठता, पात्रता, प्रमाणपत्रे व हरकतींच्या निवारणातील अनियमितता, तसेच उच्च न्यायालयाच्या १० जुलै २०२६ च्या निर्णयानंतर आणि शिक्षण संचालकांच्या ५ ऑगस्ट २०२६ च्या निर्देशांनंतरही सप्टेंबरमध्ये राबविण्यात आलेल्या पदोन्नती प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सन २०२५-२०२६ मधील अतिरिक्त शिक्षक समायोजन, सन २०२५ मधील ऑनलाइन बदली प्रक्रियेत झालेल्या कथित नियमबाह्य पदस्थापना, आदेशांमधील बदल आणि पारनेर तालुक्यातील नऊ शिक्षकांच्या समायोजनाचीही चौकशी व्हावी, अशी मागणी आहे. याशिवाय गणवेश योजनेतील कापड खरेदी, गुणवत्ता तपासणी, दहा शाळांचे रोखलेले अनुदान, मुख्याध्यापकांवरील कारवाई, शिक्षकांना दिलेल्या नोटिसा, शाळा तपासणीतील कथित मनमानी, महिला शिक्षकांना कामकाजाच्या वेळेनंतर थांबविणे आणि शिक्षकांशी गैरवर्तन केल्याच्या तक्रारींचीही निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर जगन्नाथ पाटील यांच्याविषयी प्राप्त तक्रारींची निष्पक्ष चौकशी होईपर्यंत प्रशासकीयदृष्ट्या योग्य अंतरिम उपाययोजना कराव्यात. प्रथमदर्शनी गंभीर अनियमितता आढळल्यास नियमानुसार निलंबनाची कार्यवाही करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. या व इतर १६ मागण्यांसाठी हे आंदोलन सुरु करण्यात आले असून सायंकाळी उशिरापर्यंत आंदोलन सुरूच होते.

गुरुवाणी - ११५

एकजूट कायम राखा..

राजा प्रदेशी जेव्हा परमात्म्यांच्या दर्शनासाठी आला तेव्हा इंद्रभूती गौतमच्या मनात त्याच्या प्रती प्रेम निर्माण झाले. तो तीर्थंकरांना याचे कारण विचारतो, तेव्हा प्रभू महावीर त्याला राजा प्रदेशीचे संपूर्ण चरित्र सांगतात. चित्र सारथीच्या मनात येते माझा मित्र राजा प्रदेशी धर्माच्या मार्गावर आला पाहिजे. तो असे वातावरण तयार करतो की केशी श्रमण व राजा प्रदेशीची भेट होते. त्याने घोड्याला पाण्यापर्यंत आणले पण पाणी प्यायचे की नाही हे घोड्यावर अवलंबून असते. येथे राजा प्रदेशीच्या मनात श्रद्धा नव्हती पण तो संवाद साधण्यास तयार झाला. संवादातून सुधारण्याची संभवना तयार होते. त्याने मनातील शंका दूर करण्यासाठी पाऊल टाकले. आगममध्ये राजा प्रदेशी आणि केशी श्रमण यांच्यातील संवादावर भाष्य आहे. राजा प्रदेशी संपूर्ण जगासमोर प्रोटोकॉल तोडल्याची क्षमा मागण्याचे ठरवतो. नंतर तो सगळ्यांना घेऊन येतो. जनता आश्चर्यचकित झालेली असते. तिथं पोहचताच सर्वांसमक्ष राजा प्रदेशी आपल्या सर्व दुष्कृत्यांसाठी वारंवार क्षमायाचना करतो. अशी क्षमा जर मानली तर त्याचा संपूर्ण जगावर परिणाम होतो. आतील विष काढले तरच अमृतमय बनाल. नेल्सन मंडेला २७ वर्षे तुरुंगात होते. त्यांचे इंग्रजांनी खूप हाल केले. नरक यातना दिल्या. पण तुरुंगातून बाहेर आल्यावर त्यांनी कोणतीही बदल्याची भावना ठेवली नाही. इतका मोठा क्षमाभाव त्यांच्या मनात होता. असे परिवर्तन आपल्या जीवनात आले पाहिजे. 'भयंकर' राजा प्रदेशी सुद्धा अशाच भावनेतून 'शुभंकर' झाला. तुमच्या आतील सत्यच तुम्हाला सिद्धी देईल. केशी श्रमण यांनी धर्म सभेला संबोधित करताना राजा प्रदेशीला नक्कीच अनुमोदन दिले असेल. ते म्हणतात, 'आता सुधारला आहेस तर परत बिघडू नकोस'. आता चर्चा समर्पण चातुर्मासासाठी योगदान देणाऱ्या नगरमधील विविध संघांविषयी बोलतो. गुरूदेवांच्या भूमीत त्यांच्या शिष्याचा चातुर्मास होणार आहे, म्हणून सर्व संघांनी त्यांच्या स्थानकांत चातुर्मास न घेण्याचा एकमुखी निर्णय घेतला. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतो. गुरुदेवांच्या शिष्यासाठी संपूर्ण नगर एक आहे हा संदेश त्यांनी दिला. सर्व संघांनी त्यांच्याच प्रांगणात चातुर्मास आहे असा अपूर्व उत्साह दाखवला. केडगाव, भूषणनगर, आगरकर मळा, सारसनगर, सिव्हिल हडको, महावीर नगर, नवनागापूर, सावेडी, नवीपेठ, भिंगार अशा सर्वच संघांनी चातुर्मासात एकतेचा संदेश दिला आहे. गुरूदेवांच्या या पावन भूमीत हीच एकजूट कायम ठेवा.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.



जिल्हा न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या संपाच्या दुसऱ्या दिवशी अहमदनगर बार असोसिएशनच्या वतीने अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे व पदाधिकाऱ्यांनी आंदोलन स्थळी जाऊन संपास जाहीर पाठींबा दिला. यावेळी वकील व आंदोलक कर्मचारी उपस्थित होते.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या संपाला वकील संघटनेचा पाठींबा

जोवर सर्व मागण्या मान्य होत नाही तोवर माघार घेऊ नका : अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे यांचे आवाहन

नगर – जिल्हा न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी सुरू केलेल्या संपाला अहमदनगर बार असोसिएशनच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. कर्मचाऱ्यांच्या संपामुळे न्यायालयीन कामकाजावर तसेच पक्षकार आणि सर्वसामान्य नागरिकांवर परिणाम होत असला, तरी त्यासाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या मागण्या महत्वाच्या आहेत. न्यायदान प्रक्रियेत न्यायाधीश, वकील यांच्या बरोबरीने कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदन आहे. प्रशासनाने या संपाची लवकरात लवकर दखल घ्यावी. तात्पुरते आश्वासन न देता न्यायालयीन कामकाज पूर्ववत सुरू होण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे. अभी नाही तो कभी नाही त्यामुळे जोवर सर्व मागण्या मान्य होत नाही तोवर माघार घेऊ नका. कर्मचाऱ्यांनी यासाठी वकील संघटना खंबीरपणे कर्मचाऱ्यांच्या मागे उभी आहे, अशी ग्वाही बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे यांनी दिली.

जिल्हा न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या संपाच्या दुसऱ्या दिवशी अहमदनगर बार असोसिएशनच्या वतीने अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे व पदाधिकाऱ्यांनी आंदोलन स्थळी जाऊन संपास पाठींबा दिला. यावेळी असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड. भाऊसाहेब घुले, सचिव ॲड. विनोद शेटे, खजिनदार ॲड.वसीम खान, महिला सचिव ॲड.सारिका झरेकर, ॲड.प्राजक्ता करांडे, ॲड. राजेश कावरे, ज्येष्ठ विधीज्ञ सुरेश लगड, ॲड.सतीशचंद्र सुद्रिक, ॲड.सुरेश भोर, ॲड. शहाणे, ॲड. रणजीत गोरे, ॲड. युवराज पाटील, ॲड.संकेत सुंबे, ॲड. सतीश गुगळे, ॲड.सचिन आंधळे, ॲड.आकाश कावरे, ॲड.धनंजय वाघ, ॲड.राजनंदिनी पुंडे, ॲड.रोहित कळमकर, ॲड.अभिषेक मेसे, ॲड.पंकज खराडे, ॲड. गौरव दांगट, ॲड.अमित गाडेकर, अण्णासाहेब वाळके, स्नेहा लोखंडे, आकाश कावरे उपस्थित होते. यावेळी घोषणाबाजी करण्यात आली.

कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अंकुश सांगळे यांनी वकील संघटनेने संपास पाठींबा दिल्याबद्दल आभार मानून या पाठींब्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांना अधिक बळ मिळाल्याच्या भावना व्यक्त केल्या. सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या वतीनेही यावेळी अध्यक्ष हेमंत जोशी यांनी संपास पाठींबा देण्यात आला.

आनंद तीर्थ समवशरण, नगर येथे २० नोव्हेंबर रोजी डॉ. भूषण भळगट यांचे कॅन्सर जनजागृतीपर व्याख्यान



नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पवित्र कर्मभूमीत आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे समर्पण चातुर्मास २०२६ होत आहे. याठिकाणी २० नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता कॅन्सर निदान व उपचार या विषयी कॅन्सर जनजागृतीपर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. पुणे येथील कॅन्सर सर्जन डॉ. भूषण संजय भळगट या व्याख्यानातून मार्गदर्शन करणार आहेत.

डॉ.भूषण भळगट हे जबडा, तोंड, थायरॉईड, स्तन, फुप्फुस, लहान व मोठे आतडे, लिव्हर, किडनी, मुत्राशय, प्रोस्टेट, गर्भाशय, अंडाशय, त्वचेच्या गाठी ई.कॅन्सर संबंधित ऑपरेशन पुण्यातील रुबी हॉल, सह्याद्री, जहांगीर, के.ई.एम, मणिपाल, अपोलो, पुना हॉस्पिटल या नामांकित दवाखान्यात करतात.

महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा. यांच्या सान्निध्यात उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा. यांचा सुरू असलेला समर्पण चातुर्मास शिखरावर पोहचला आहे. उपाध्यायश्रीजींच्या अनमोल मार्गदर्शनाचा लाभ भाविकांना मिळत आहे. जीवनाला दिशा देणारे आध्यात्मिक विचार सर्वांसाठी पर्वणी ठरत आहेत. याच अनुषंगाने याठिकाणी डॉ. भूषण भळगट यांच्या कॅन्सर विषयक जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

कॅन्सर हा आजार दुर्धर मानला जातो. परंतु योग्यवेळी निदान झाले तर चांगल्या उपचारांनी तो पूर्ण बराही होऊ शकतो. तसेच योग्य आहार विहार, सकारात्मक जीवनशैली ठेवल्यास कॅन्सरला प्रतिबंध केला जाऊ शकतो. कॅन्सर निदानाच्या आधुनिक पद्धती तसेच आधुनिक उपचार सुविधा आता उपलब्ध आहेत. याच संदर्भात डॉ. भळगट सविस्तर अनुभूती मार्गदर्शन करणार आहेत.

या व्याख्यानास उपस्थित राहावे असे आवाहन समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, उद्योगपती सौरभ प्रमिलाताई हेमराज बोरा परिवाराने केले आहे.

पुतण्यानेच केली दागिन्यांची चोरी

राहुरी – राहुरी तालुक्यातील उंबरे येथे घरामधून तब्बल ९ लाख ७५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून फिर्यादी महिलेने या चोरी बाबत आपल्या पुतण्यावर संशय व्यक्त केला आहे.

याबाबत संगीता शिवाजी क्षीरसागर (वय ४० वर्षे, रा. उंबरे, ता. राहुरी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या उंबरे येथील घरामधून १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजेपासून ते १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजेच्या दरम्यान हा चोरीचा प्रकार घडला.

फिर्यादी यांच्या घरातील सुमारे ९ लाख ७५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने फिर्यादीचा पुतण्या वैभव बापूसाहेब क्षीरसागर (रा. उंबरे, ता. राहुरी) याने चोरून नेले आहेत असा संशय फिर्यादीने व्यक्त केला आहे. या फिर्यादी वरून राहुरी पोलीस ठाण्यात संशयित आरोपी वैभव क्षीरसागर याच्या विरुद्ध बीएनएस कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, प्रकरणाचे पुढील तपास पोलीस अंमलदार निकम करत आहेत.



समान काम, समान वेतन या तत्त्वानुसार उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली बेमुदत संप पुकारला आहे. दुसऱ्या दिवशीही संप सुरूच होता. (छायाचित्र : लहु दळवी)

न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा संप दुसऱ्या दिवशीही सुरूच

२६ नोव्हेंबरला चर्चेसाठी मुख्यमंत्र्यांनी दिली वेळ

नगर – समान काम, समान वेतन या तत्त्वानुसार उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्रातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप पुकारला आहे. या संपात अहिल्यानगर जिल्ह्यातील सुमारे १३०० न्यायालयीन कर्मचारी सहभागी झाले आहेत. दुसऱ्या दिवशीही संप सुरुच असल्याने न्यायालयीन कामकाजावर याचा परिणाम झाल्याचे दिसून आले. दरम्यान, या संपावर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना मागण्यांवर चर्चा करण्यासाठी २६ नोव्हेंबर रोजी वेळ दिली आहे. त्यामुळे तोपर्यंत तरी हा संप सुरूच राहणार आहे.

महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली राज्यभर हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांनीही या संपाला पाठिंबा दिला आहे. तसेच अहमदनगर बार असोसिएशननेही या संपास पाठिंबा जाहीर केला आहे. २४ व २५ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री फडणवीस हे कामानिमित्त बाहेर असल्याने या प्रश्नावर त्यांनी भेटीसाठी २६ नोव्हेंबर ही तारीख दिली आहे पण न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या भावना लक्षात घेऊन २४ तारखेच्या आधीच मुख्यमंत्री यांची याविषयावर भेट घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना सांगितले आहे.

या संपाच्यावेळी जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अंकुश सांगळे, कार्याध्यक्ष शिरीष ढाळे, सचिव रवींद्र सूर्यपुजारी, उपाध्यक्ष अतुल खरपुडे यांनी दिली. प्रबंधक संदीप कडू, अविनाश लिपाने, अधीक्षक डी बी शिंदे, बी एम गुंजाळ, डी बी काकडे, अरुण शिंदे, आनंद सोनपसारे संगीता कोल्हे, सविता भालेराव, वैशाली बुऱ्हाडे, स्वाती क्षीरसागर, दादाभाऊ आंधळे, कुमुदिनी गायकवाड, बी डी शिंदे, ग्रीष्मा सोनसळे, श्रीपाद माचवे, रवींद्र घोडके, गणेश सब्बन, संतोष लयचेट्टी, सतिश ढवळे, उद्धव नरवडे, युवराज गुंजाळ, दिपक दुसुंगे व सर्व न्यायालयीन कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष हेमंत जोशी, अविनाश नगरकर, दयानंद अन्नदाते, अविनाश नगरकर, अशोक दहिफळे, गावडे मामा, श्री. संदुपटला, श्री. पोंदे, श्री. लांबदाडे, श्री. अन्नदाते, ज्ञानदेव धामणे, दत्तात्रय लोखंडे, शिके तरडे, रंगनाथ अवसारे व इतर सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित आहेत.

कोयता, मिरची पूड,कटावणी घेवून दरोडा टाकायला आलेली टोळी पकडली

मोक्का गुन्ह्यातील फरार आरोपीचा समावेश, २ लाख ४१ हजारांचा मुद्देमाल जप्त



नगर – पुणे जिल्ह्यातील मोक्का गुन्ह्यातील फरार आरोपीसह अहिल्यानगर जिल्ह्यात दरोडा टाकण्यासाठी आलेल्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. या टोळीतील तिघे पोलिसांच्या हाती लागले असून तिघेजण अंधाराचा फायदा घेत पसार झाले आहेत. पकडलेल्या आरोपींकडून पोलिसांनी कोयता, एक कटावणी, एक पाना, मिरची पूड, एक स्क्रू ड्रायव्हर, तीन मोटारसायकली, तीन मोबाईल फोन असा २ लाख ४१ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

१७ नोव्हेंबर रोजी रात्री स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कर्जत पोलीस स्टेशन हद्दीत गस्त घालत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, राशीन ते चिलवडी जाणाऱ्या रोडने मोटारसायकलवरून काही इसम दरोडा टाकण्याच्या उद्देशाने जात आहेत. मिळालेल्या या खात्रीशीर माहितीच्या आधारे पथकाने राशीन ते चिलवडी जाणाऱ्या रस्त्यावर पिराच्या माळावर सापळा रचला. काही वेळातच तीन संशयित मोटारसायकलवरून काही इसम येताना दिसले. पोलिसांनी त्यांना थांबण्याचा इशारा केला असता, पोलिसांची चाहूल लागताच ते मोटारसायकली जागेवरच टाकून पळून जाऊ लागले.

पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदारांनी त्यांचा पाठलाग केला आणि बाक्या बंड्या काळे (वय ३९, रा. आखोणी, ता. कर्जत), गोट्या बंडू काळे (वय २५, रा. आखोणी, ता. कर्जत) आणि धोंड्या ईश्वर भोसले (वय २८, रा. बेलगाव, ता. कर्जत) या तिघांना शिताफीने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या या आरोपींकडे विचारपूस केली असता, अंधाराचा फायदा घेऊन पळून गेलेल्या त्यांच्या साथीदारांची नावे शुभम गहिनीनाथ भोसले (रा. बेलगाव, ता. कर्जत), रोहित नितीन चव्हाण (रा. केडगाव, ता. अहिल्यानगर) आणि सुमित नितीन चव्हाण (रा. केडगाव, ता. अहिल्यानगर) अशी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

पोलिसांनी घटनास्थळावरून दरोड्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य आणि वाहने असा एकूण २ लाख ४१ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ताब्यात घेतलेल्या तिन्ही आरोपींना जप्त मुद्देमालासह कर्जत पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून, सर्व सहा आरोपींविरुद्ध कर्जत पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१०(४), ३१०(५), ३१०(६) सह भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासली असता, यातील आरोपी धोंड्या ईश्वर भोसले हा पुणे जिल्ह्यातील दौंड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गंभीर गुन्ह्यात फरार असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे या गुन्ह्याला महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यांतर्गत (मोक्का) कलम लावण्यात आलेले आहे. सदरची कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे आणि पोलीस अंमलदार अरविंद भिंगारदिवे, योगेश भिंगारदिवे, गणेश धोत्रे, भिमराज खर्से, अमोल कोतकर, प्रताप देवकाते, दिपक जाधव व जालिंदर साखरे यांच्या पथकाने केली आहे.

शेअर ट्रेडिंग फसवणूक प्रकरणातील आरोपीचा जामीन अर्ज फेटाळला

नगर – शेअर ट्रेडिंग मध्ये गुंतवणुकीतून ज्यादा परताव्याचे आमिष दाखवत गुंतवणूकदाराची ३२ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपी नानासाहेब हरीभाऊ घनवट याचा जामीन अर्ज जिल्हा न्यायालयाने दुसऱ्यांदा फेटाळला असल्याची माहिती फिर्यादीचे वकील ॲड. सतिशचंद्र सुद्रीक यांनी दिली आहे.

शेवगांव येथील पोलिस स्टेशन फिर्यादी संदिप सुभाष शिंदे, (रा. हिवरे, ता. नेवासा) यांनी १२ जुलै २०२६ रोजी आरोपी नानासाहेब हरीभाऊ घनवट याचे विरुध्द फिर्याद दिली होती की, आरोपी याने फिर्यादी शिंदे यास त्याच्या शेवगांव येथील एन ॲण्ड एन असोसिएटस् नावाच्या शेअर मार्केट ट्रेडिंगच्या ऑफिसवर बोलावून घेऊन माझ्याकडे गुंतवणुक करा, मी तुम्हांस प्रती महिना ६ टक्के परतावा देईल असे सांगून विशवास संपादन करुन आरोपीने फिर्यादीकडून ३२लाख रुपये घेतले होते. पण ३ वर्ष त्यास कोणतीही रक्कम दिली नाही.

शेवटी वाट पाहून फिर्यादी याने फोनहून पैशाची मागणी केली असता, त्याने फिर्यादीस शिवीगाळ करुन म्हणाला की, तुझे पैसे मी देणार नाही, तुला काय करायचे ते करुन घे व शेवगांवमध्ये येऊन माझ्या भावास पैशाची मागणी केली तर गाडीखाली मारुन टाकीन अशी धमकी दिली अशी फिर्याद दिली होती. या फिर्यादी वरुन शेवगांव पोलिसांनी आरोपी विरुध्द महाराष्ट्र ठेवीदारांचा संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३,४ तसेच भारतीय न्याय संहिता कलम ३१८, ३१६, ३१६ (१) अन्वये गुन्हा दाखल केला होता.

या गुन्ह्याच्या तपासात आरोपीने अन्य ठेवीदारांचे पण ४४ लाख रुपये असे एकंदर ७६ लाख रुपये जमा केले म्हणून आरोपी यास शेवगांव पोलिसांनी अटक केली होती. त्यानंतर त्याने येथील जिल्हा न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला असता, तो फेटाळण्यात आला. त्यानंतर लगेचच आरोपीतर्फे येथील जिल्हा न्यायालयात पुन्हा जामीन अर्ज दाखल केला असता तो जामीन अर्ज देखील जिल्हा न्यायालयाने फेटाळला आहे. जिल्हा न्यायालयात दोन्ही वेळेस मुळ फिर्यादीतर्फे ॲड. सतिशचंद्र सुद्रीक यांनी काम पाहिले.

भाऊबीजेनिमित्त माहेरी गेलेल्या विवाहितेच्या लाखोंच्या दागिन्यांची भरदिवसा चोरी

नगर – भाऊबीजेच्या निमित्त माहेरी गेलेल्या विवाहितेच्या राहत्या घराचा पाठीमागील दरवाजा उघडून अज्ञात चोरट्यांनी घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख १९ हजार रुपये किमतीचा ऐवज लांबवल्याची घटना १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वाजेपासून ते दुपारी २.३० वाजेच्या दरम्यान वाफारेवाडी, कर्जुले हर्या (ता.पारनेर) येथे घटना घडली.

याबाबत अर्चना संदीप काळे (वय ३० वर्षे, रा. निघोज, ता. पारनेर, माहेर – वाफारेवाडी, कर्जुले हर्या, ता. पारनेर) यांनी पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी अर्चना काळे या भाऊबीज सणानिमित्त कर्जुले हर्या येथील वाफारेवाडी येथील त्यांच्या वडिलांच्या घरी गेल्या होत्या. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वाजेपासून ते दुपारी २.३० वाजेच्या दरम्यान फिर्यादी घरामध्ये नसताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या राहत्या घराच्या पाठीमागील दरवाजा उघडून घरात प्रवेश केला. घरात कोणाही नसल्याची संधी साधून चोरट्यांनी घरातील कपाटाची व सामानाची उचकापाच करून एकूण १ लाख १९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली. आपले माहेरचे घर फोडून आपल्या दागिन्यांची आणि रोख रकमेची चोरी झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने १७ नोव्हेंबर रोजी पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५ नुसार गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पारनेर पोलीस ठाण्याचे स.पो.नि. सोमनाथ दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार जी. एस. गायकवाड करत आहेत.

पोलीस असल्याची बतावणी करत दागिने लांबविले

राहाता – आपण पोलीस आहोत अशी बतावणी करून मला तुमचे दागिने चेक करायचे आहेत असे सांगत ७० वर्षीय वृद्ध महिलेची दिशाभूल करत त्यांचे ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने एका अनोळखी भामट्याने लंपास केल्याची घटना राहाता तालुक्यातील पुणतांबा परिसरात उघडकीस आली आहे.याप्रकरणी राहाता पोलीस ठाण्यात तोतयागिरी व फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी अज्ञात आरोपीचा शोध सुरू केला आहे.

याबाबत सुमन चांगदेव बनकर (वय ७० वर्षे, रा. पडेगाव, ता. श्रीरामपूर) यांनी फिर्याद दिली आहे. १६ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी या शिर्डी रोडवरील कालव्याजवळ, पुणतांबा (ता. राहाता) येथून जात असताना एका अनोळखी इसमाने त्यांना गाठले. या भामट्याने फिर्यादी यांना आपण पोलीस असल्याचे सांगून त्यांच्या गळ्यातील व कानातील सोन्याचे दागिने तपासायचे असल्याची बतावणी केली. पोलिसांची भीती व विश्वास वाटल्याने वृद्ध महिलेने आपल्या गळ्यातील आणि कानातील सोन्याचे दागिने काढून त्या भामट्याच्या हातात दिले.

दागिने हातात येताच संधी साधून सदर अनोळखी इसमाने २० हजार रुपये किमतीचे ६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे घुंगरू असलेले कानातील टाप्स आणि २० हजार रुपये किमतीचे ५ ग्रॅम वजनाचे २४ सोन्याचे मणी असलेली पोत असा एकूण ४० हजार रुपये किमतीचा ऐवज घेऊन तेथून पळ काढला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर वृद्ध महिलेने राहाता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अनोळखी भामट्या विरुद्ध बीएनएस कलम २०४ आणि ३१८(२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

ड्रायव्हर पाहिजे
जीतो गाडीवर
ड्रायव्हर
राजमुद्रा ट्रान्सपोर्ट
कल्याणरोड,अहिल्यानगर
9881478711

इलेक्ट्रॉनिक्स शोरुमसाठी पाहिजेत
सेल्समन–१
सेल्सगर्ल–१
हेल्पर–१
9225323213

पाहिजेत
नामांकित कंपनी
हॅप्पी मेडिकेअर
सावेडी, अहिल्यानगर येथे नामांकित कंपनीत ऑफिस कामासाठी मुली व मुले पाहिजेत.
शिक्षण -१२ वी पास व पदवीधर,
वयोमर्यादा १९ ते ३० पर्यंत
संपर्क
9172194775
8459809981

ऑफिस कामासाठी मुले/मुली पाहिजेत
कॉम्प्युटरचा अनुभव असल्यास प्राधान्य
9049014260

टँकर पाणी मिळेल
अ. नगर MIDC मध्ये
५ हजार लिटर
१० हजार लिटर
गोडपाणी टँकर पाणी मिळेल
(संपर्क-राधाकृष्ण भालसिंग)
9421588875

भाड्याने देणे
गजराज नगर येथे सर्व सोयुक्त
आर.सी.सी शेड
भाड्याने देणे
(पाच हजार स्क्वेअर फुट)
8237986313

पाहिजेत
हेल्पर
पुरुष – ४
महिला – २
वेळ– १० ते ७
9075016488

पाहिजेत
इलेक्ट्रिक दुकानाच्या कामाकरिता
मुलगा पाहिजे
संपर्क- शिवशंकर इलेक्ट्रिकल
१०९८ शिंपीगल्ली तेलीखुंट, अहिल्यानगर
9890904872

सावेडी येथील नामांकित शोरुमसाठी त्वरित पाहिजेत
सेल्समन/सेल्सगर्ल- १०
१ ते २ वर्षाचा अनुभव
कॅशिअर–०४
(आकर्षक पगार) -अर्जासह समक्ष भेटा -
Franchise by - DB VENTURES One Stop Shop
SONY GIFTS PVT. LTD.
Address : Opp. Gold's Gym, TV Center, Savedi Road, A.Nagar
7887395983

जाहीर नोटीस
तमाम लोकांस कळविण्यात येते की,खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **श्री.राजेश राजकुमार छाबरिया उर्फ छाब्रीया रा.स.नं.२६३/८९. संत दर्शन पॅलेस. आशा हौसिंग सोसायटी जवळ, मिस्किननगर, सावेडी. अहिल्यानगर** यांचे स्वतंत्र मालकी व वहिवाटीची आहे,सदरील मिळकती या आज रोजी निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा देवून ती आमचे अशिलांस खरेदी देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे.आमचे अशिल हा खरेदी व्यवहार लवकरच पुर्ण करण्याचे विचारात आहेत.तत्पुर्वी या मिळकतींची विद्यमान मालकांची मालकी व मिळकती निर्वेध व निजोखमी असल्याबाबतची खातरजमा करून घेण्याच्या उद्देशाने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे.सबब ज्या कोणाचेही कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, अथवा हितसंबंध या मिळकतीत असतील अशाने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवसांपासुन **७ दिवसांचे** आत त्याचे या मिळकतीशी असणाऱ्या हितसंबंधाबाबतच्या कागदोपत्री पुराव्यांनीशी खाली सही करणाऱ्यांकडे समक्ष भेटून त्याची खातरजमा करून घ्यावी. व या व्यवहारांस लेखी हरकत घ्यावी.या मुदतीत जर कोणाचीही हरकत आली नाही तर ही मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राहय धरून आमचे अशिल त्याचा खरेदी व्यवहार पुर्ण करेल व मग कोणाचीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

-परिशिष्ट- मिळकतीचे वर्णन :-

जिल्हा तुकडी अहिल्यानगर पो.तु.ता.नगर पैकी अहिल्यानगर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे शेंडी येथील मे.दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर, यांचे कार्यक्षेत्रातील असुन सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

अ) गट नं.	एकुण क्षेत्रफळ	आकार
२१०/१	० हे. ४७.५० आर	२ रू.१६पै.

यापैकी विदयमान मालकांची संपुर्ण हिश्याची ० हे. ४३.५० आर जमिन आमचे अशिलांस खरेदी देण्याचे ठरले आहे, वागणुकीचे, वहिवाटीचे, रस्त्यांचे हक्कांसह काही एक राखुन न ठेविता. तसेच गट नं.२१३ मधील लिहुन देणार यांचे मालकीचे अविभक्त हिश्याचे संपुर्ण क्षेत्र तसेच विहीर व विहीरमधील पाणी हिश्याप्रमाणे घेण्याचे हक्कासह आहे त्या स्थितीत संपूर्ण मिळकत.

यांसी चतुःसिमा

पुर्वेस :- गट नं.२१२ पैकी शिंदे यांची जमीन व गट नं.२१३.
दक्षिणेस :- ओढा व गट नं.२११. पश्चिमेस- गट नं.२१०/२.
उत्तरेस - वडगांव गुप्ता रोड (बायपास)

ब) गट नं.	एकूण क्षेत्रफळ	आकार
२११	० हे. १८ आर	० रू. ४७पै.

ही संपुर्ण जमिन आमचे अशिलांस खरेदी देण्याचे ठरले आहे, वागणुकीचे, वहिवाटीचे, रस्त्यांचे हक्कांसह काही एक राखुन न ठेविता.


यांसी चतुःसिमा :-

पुर्वेस - नदी. दक्षिणेस - नदी.
पश्चिमेस - गट नं.२०७. उत्तरेस- गट नं.२१०/१ व गट नं.२१०/२.
येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वकची मिळकत.
जाहीर नोटीस दिली.ता.१८.११.२०२६.

ॲड. निहालअहमद बाबुलाल बागवान
श्रेयस लॉनच्या मागे,सैनिक कॉर्नर, तपोवन रोड, भिस्तबाग, अहिल्यानगर, मो.९९२१३५५७७८

ॲड. विजय प्रल्हाद अत्रे
''पूर्णश्री'', प्लॉट नं.२८, स्वामी गजानन नगर, कजवे मळा, भिस्तबाग, अहिल्यानगर. मो.९८२२०४३९६७.

विकणे आहे
सुडके मळा,
बालिकाश्रम रोड येथे
प्लॉट ३००० स्क्वे. फुट
बांधकाम २२०० स्क्वे फुट
9421588502
7588513921





VSP फायनांशियल सर्व्हिसेस बँकेच्या टेली कॉलिंग साठी
महिला/मुली त्वरित पाहिजेत
जागा – १०
बायोडाटा व आधारकार्ड झेरॉक्स, फोटोसह समक्ष भेटावे.
३ रा मजला, शिव-पार्वती अपार्टमेंट, बालिकाश्रम रोड, अ.नगर.
मो. 8308090765

पाहिजेत
शासनमान्य शाळा व कॉलेजसाठी खालील प्रमाणे जागा त्वरित भरणे आहेत.

शिक्षक	डी.एड./बी.एड (Male)	जागा : ०४
एम.एस.सी	बायोकेमिस्ट्री/फिजिक्स/ मायक्रोबायोलॉजी	जागा : ०२
मार्केटींग ऑफिसर	MBA/MSW/Any Graduate with experience	जागा : ०२
कॉम्प्युटर ऑपरेटर	12 th/ Any Graduate. Computer Knowledge with Marathi/English Typing	जागा : ०३
रिसेप्शनिस्ट	१२ वी (Computer Knowledge is Must)	जागा : ०२
डॉक्टर	BAMS/BHMS/BUMS	जागा : ०३

इच्छुकांनी संपूर्ण माहिती व अर्जासह ७ दिवसात समक्ष भेटावे किंवा खालील ई-मेलवर अर्ज पाठवावेत.
जीवनज्योत इंग्लिश मिडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज
बॉम्बे हॉस्पिटल/बेकर्स समोर, वन विभाग कार्यालय मागे, संभाजी नगर रोड, अहिल्यानगर
Mo. 8830685732 | Email : jjmf@rediffmail.com

पाहिजेत
मेडिकल दुकानासाठी
मुलगा किंवा मुलगी पाहिजे
अर्जासह समक्ष भेटा
चांगल्या वातावरणात काम करण्याची संधी
दुर्गा मेडिकल
चितळेरोड, प्रिन्स हॉटेल शेजारी, अ. नगर
7972634308

फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी व निर्व्यसनी कारागीर पाहिजेत
* कारागीर – ४
* हेल्पर – ६
प्रसन्न फॅब्रिकेटर्स
एल-५२,एमआयडीसी, अहिल्यानगर
9822499210
9657646555

जाहीर नोटीस
तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत हि विद्यमान मालक यांचे खरेदी मालकी वहिवाटीची आहे. सदर मिळकतीबाबत विद्यमान मालक यांनी आमचे आशिलाबरोबर सौदा केलेला असून नोंदणीकृत साठेखत लिहून दिलेले आहे व साठेखतावर विसार रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही वाद अथवा गहाण, दान, बक्षिसपत्र, अव्वल जशी, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट, अगर इतर कोणताही वाद चालू असल्यास संबंधीतांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिष्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे प्रमाणित नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. विहित मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

-: परिशिष्ट मिळकत वर्णन :-

जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी ता. नगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे शहरनगर येथील हिरवेगल्ली भागातील मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे –

सि.स.नं.	म्युक-नं.	क्षेत्रफळ
५९८०	११०	१३०-४० चौ.मी.

हि संपुर्ण मिळकत व वावर तळ मजल्यावरील हॉल, किचन, बैठक, पॅसेज, रूम्स. संडास, बाथरूम तसेच पहिल्या मजल्यावरील रुम्स, बेडरुम, गॅलरी, संडास, बाथरूम व जीना असे एकूण बांधकाम क्षेत्र १८६-९५ चौ.मी. यातील इले लाईट मीटर व नळ कनेक्शन तसेच ५के.व्ही. सोलर पॅनल सेट, बोअरवेल पाण्याची मोटार, सोलर वॉटर हिटर व फिक्स फर्निचरसह, अशी संपुर्ण घरमिळकत काहीएक राखून न ठेविता.

यांसी चतुःसिमा :-

पुर्वेस - सि.स न नं. ५९८३/१, दक्षिणेस - सि.सनं. ५९८१/अ व ५९८१/ब, पश्चिमेस - रस्ता व गल्ली, उत्तरेस - रस्ता व गल्ली.

सदर मिळकतीचे विद्यमान मालक -
१) श्री. नंदकुमार नारायणराव कोंबळे
२) सौ. दिपीका नंदकुमार कोंबळे
दोघे रा. ११०, कुंभारगल्ली, नालेगांव, अहिल्यानगर-४१४००१.
दि.१८/११/२०२६ अहिल्यानगर

ॲड. राजेंद्र पी. शेलोत
ॲड. हर्षद राजेंद्र शेलोत
'अहंम', प्लॉट नं.२६, आदिनाथ कॉलनी, राऊत मळा, अहमदनगर.
मो.न. ९४२२२२३४४१, ९८३४००२९४१



अक्षय मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध!
* अत्याधुनिक मोतीबिंदू (Phaco) शस्त्रक्रिया * चष्मा काढण्यासाठी लेसर उपचार (LASIK)
* केरॅटोकोनससाठी C3R उपचार कॉर्निया प्रत्यारोपण (Corneal Transplant)
* कॉर्नियावरील जखम व संसर्गाचे उपचार * पेटेरिजियम (डोळ्यावरील मास) शस्त्रक्रिया
* काचबिंदू (Glaucoma) तपासणी व उपचार
* रेटिना इंजेक्शन उपचार * तिरळेपणा शस्त्रक्रिया
* संगणकीकृत नेत्र तपासणी व चष्म्याचा नंबर
सर्व प्रकारच्या डोळ्यांच्या आजारांवर आधुनिक व तज्ञ उपचार
या तक्रारींवर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबीर

डॉ.सौ.नलिनी गिते (महिंद्रकर)
नेत्र व कॉर्निया तज्ञ / मोतीबिंदू तज्ञ
MBBS, MS (Ophthalmology) FGO,
FCRS (H.V. Desai Eye Hospital, Pune)

अक्षय मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल व प्रसुतिगृह
गीते हॉस्पिटल, बालिकाश्रम रोड,अहिल्यानगर Mo : 9257575714

आपल्या हृदयाची काळजी कशी घ्याल ?
रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ
यांच्या मार्गदर्शनाखाली
मोफत हृदयरोग तपासणी शिबीर
Cardic OPD प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी
पुढील लक्षणे असणाऱ्या रुग्णांनी या संधीचा लाभ घ्यावा.
छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे.
अहिल्यानगर येथे गुरुवार दि. १९ नोव्हें. २०२६ दुपारी २.३० ते ३.३०
साई एशियन हॉस्पिटल
तारकपूर बस स्टॅण्ड समोर, अहिल्यानगर. फोन : ०२४१- २३२५६४८
संतोष दसासे (सिनिअर मॅनेजर) 7385195962, 9209632502

दर्जेदार व माफक दरात फ्लेक्स प्रिंटींग
9403232323



१६ वाँ स्मृतिदिन
कै.तीरथरामजी कारिरामजी अरोरा
स्व.दि. १८/११/२०१०
संस्कार, स्नेह, सहानुभूती या तत्वातुन घडली, आपल्या जीवनाची अमृतगाथा.. प्रेरणा देत राहतील आपल्या स्मृती आम्हां सदैव आता...
आपल्या चरणी आम्हा सर्वांची भावपूर्ण श्रद्धांजली
आपकी पावन स्मृतीमें भावपूर्ण श्रध्दांजली!
* दु:खांकित *
महेश तीरथरामजी अरोरा, मुकेश तीरथरामजी अरोरा
मनिष तीरथरामजी अरोरा, अमित तीरथरामजी अरोरा
जितेंद्र दत्ता (जमाई) **समस्त अरोरा परिवार**

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात



१९ नोव्हेंबर २०२६

रामायण २ डी (हिंदी)
08:00 AM 03:30 PM
08:45 AM 05:30 PM
10:00 AM 07:15 PM
11:45 AM 08:00 PM
12:30 PM 09:15 PM
01:45 PM 11:00 PM
11:35 PM

रामायण ३ डी (हिंदी)
10:45 AM 06:15 PM
02:30 PM 10:00 PM

आधी अनंत (मराठी)
04:45 PM



Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दिनांक : १६ ते १९ नोव्हेंबर 2026
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात



SCREEN - 2
09.00 AM 150/- 2D
01.00 PM 200/- 2D
05.00 PM 200/- 2D
09.00 PM 200/- 2D

SCREEN - 1
09.30 AM 200/- 3D
01.30 PM 250/- 3D
05.30 PM 250/- 3D
09.30 PM 250/- 3D

कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
आशा स्क्वेअर
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर